RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

रविवार, ०९ नोव्हेंबर २०२५ | वर्ष : ५ | अंक : २३१ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Sunday, 09 October 2025 | Year : 5 | Issue : 231 | Daily | Rate: Rs. 5/-

Sachin Sir's English Speaking

Its 100% guaranteed course
सबसे आसान तरीकेसे
अंग्रेजी बोलना
सिखानेके लियेही
हम जाने जाते है।
9028851719

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451



# दिल्ली विमानतळावर प्रवाशांचे हाल



नवी दिल्ली

## दिवसभरात ४०० विमानांना विलंब

**दिल्ली :** दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर शुक्रवारी हवाई वाहतूक नियंत्रण यंत्रणेत (एटीसी) तांत्रिक अडथळा उद्भवला. यामुळे ८००हून अधिक देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय विमानांना उशीर झाला, अशी माहिती सूत्रांनी दिली. या तांत्रिक समस्येचा फटका सर्व विमान कंपन्यांना आणि त्यांच्या प्रवाशांना बसला. दरम्यान, संध्याकाळी ही समस्या सोडवण्यात यश आल्याची माहिती विमानतळ प्राधिकरणाने (एएआय) दिली. 'एटीसी' डेटाला सहाय्य करणाऱ्या 'ऑटोमॅटिक मेसेज स्विचिंग सिस्टम'मधील (एएमएसएस) तांत्रिक अडथळ्यामुळे दिवसभरात दिल्लीतून किमान 20 विमान उड्डाणे रद्द करण्यात आली. त्याबरोबरच दिवसभरात इंडिगो, एअर इंडिया, एअर इंडिया एक्स्प्रेस, स्पाइसजेट आणि आकासा एअर या कंपन्यांच्या विमानांना उशीर झाल्यामुळे प्रवाशांना रखडावे लागले. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातील सर्वात वर्दळीचे विमानतळ आहे. येथे दिवसभरात 1,500हून अधिक विमाने उड्डाण करतात आणि उतरतात. संध्याकाळी 'एएमएसएस'ची समस्या सोडवण्यात यश आल्याचे 'एएआय'कडून सांगण्यात आले. मात्र, सेवा सुरळीत होण्यास काहीसा वेळ लागेल अशी माहिती देण्यात आली. ही तांत्रिक समस्या दूर करण्यासाठी 'इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड'चे अधिकारी हैदराबादून दिल्लीला गेले. या समस्येचे कारण शोधण्यासाठी चौकशी केली जाईल अशी माहिती सूत्रांनी दिली.

## अमेरिकेतील शटडाऊनचा विमान सेवेवर परिणाम

**वॉशिंग्टन :** अमेरिकेत शुक्रवारी फेडरल हवाई प्रशासनाने (एफएए) देशभरातील विमानांच्या उड्डाणांमध्ये कपात करण्याचे आदेश दिले. त्यामुळे तेथील विमान सेवेवर विपरित परिणाम झाला. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशभरात शेकडो विमाने रद्द करण्यात आली. अमेरिकेतील शटडाऊन अजूनही सुरू असून त्याने विक्रमी कालावधी गाठला आहे. त्यामुळे प्रशासनाकडून हे अभूतपूर्व आदेश देण्यात आले. विमान कंपन्यांना गुरुवारीच 'एफएए'च्या अधिकृत आदेशाची कल्पना आल्यामुळे त्यांनी त्याप्रमाणे विमानांच्या वेळा बदलण्यास आणि काही विमाने रद्द करण्यास सुरुवात केली होती.

## टीईटी परीक्षा नाशिकमध्ये...



**नाशिक :** शिक्षक संघटनांनी पुरेपूर विरोध करुनही कोणताच उपयोग न झाल्याने अखेर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत 23 नोव्हेंबरला शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) होणार आहे. परीक्षेची काठिण्य पातळी अधिक असल्याने शिक्षकांकडून या परीक्षेला विरोध करण्यात येत होता. निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या शिक्षकांना या परीक्षेचा काय उपयोग, असाही प्रश्न करण्यात येत होता. मुख्यमंत्र्यांनी याप्रकरणी लक्ष घालावे, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून करण्यात येत होती. परंतु, कशाचाच काही उपयोग झाला नाही. महाराष्ट्रातील इयत्ता पहिली ते आठवी वर्गांवर नियुक्ती असलेल्या शिक्षकांना टीईटी (टीचर्स एलिजिबिलिटी टेस्ट) म्हणजेच शिक्षक पात्रता परीक्षा देणे अनिवार्य आहे. सर्वोच्च न्यायालयाने एक सप्टेंबर रोजी सर्व शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा सक्तीची करण्याचा निर्णय दिल्याने त्याविरोधात सर्व शिक्षक संघटना एकवटल्या होत्या. महाराष्ट्र राज्य कनिष्ट महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे टीईटी सक्तीचा निर्णय रद्द करावा, अशी मागणी केली होती. शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द महाराष्ट्र सरकारच्या वतीने पुनर्विलोकन याचिका दाखल करण्याचे आश्वासन शिक्षक संघटनांना दिले होते. परंतु, राज्य सरकारतर्फे कोणत्याही हालचाली करण्यात न आल्याने टीईटी परीक्षा 23 नोव्हेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे ऐन दिवाळीत शिक्षकांना अभ्यास करावा लागला. या परीक्षेसाठी नाशिक जिल्ह्यातून 19 हजारांपेक्षा अधिक अर्ज आले आहेत.

## महत्त्वाच्या बातम्या

### संसदेचे हिवाळी अधिवेशन 1 ते 19 डिसेंबर



**नवी दिल्ली :** केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर घोषणा केली की राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेचे हिवाळी अधिवेशन बोलावण्याच्या सरकारच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे, जे 1 डिसेंबर 2025 पासून सुरू होईल आणि 19 डिसेंबर 2025 पर्यंत चालेल. किरण रिजिजू यांनी ट्विट केले की, 'भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू जी यांनी 1 डिसेंबर 2025 ते 19 डिसेंबर 2025 पर्यंत संसदेचे हिवाळी अधिवेशन बोलावण्याच्या सरकारच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे (संसदीय कामकाजाच्या गरजांनुसार). आपल्या लोकशाहीला बळकटी देणाऱ्या आणि लोकांच्या आकांक्षा पूर्ण करणाऱ्या रचनात्मक आणि फलदायी अधिवेशनाची अपेक्षा आहे.'

### डॉक्टरच्या लॉकरमध्ये मिळाली AK-47 रायफल



**श्रीनगर :** जम्मू-कश्मीरच्या श्रीनगरमध्ये अनंतनागचे माजी सरकारी डॉक्टर अदील अहमद रदर यांच्या लॉकरमधून AK-47 रायफल जप्त करण्यात आल्यानंतर एकच खळबळ उडाली. अदील 24 ऑक्टोबर 2024 पर्यंत GMC अनंतनागमध्ये कार्यरत होते. ते अनंतनागमधील जलगुंडचे रहिवासी आहेत. याप्रकरणी नौगाम येथील पोलीस ठाण्यात FIR क्रमांक 162/2025 अंतर्गत, भारतीय बंदुक कायद्याच्या विविध कलमान्वये तसेच UAPA च्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस आणि तपास यंत्रणा या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करत आहेत. अदील अहमद रदर यांच्यावर, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे आणि दहशतवादी कारवायांशी संबंध असल्याची शक्यता असल्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्यांच्याकडून जप्त केलेल्या शस्त्र आणि इतर पुरावे तपासण्यास सुरुवात केली आहे. 'हे' सुरक्षा दलांचे मोठे यश - महत्वाचे म्हणजे, डॉक्टरच्या लॉकरमधून AK-47 रायफल जप्त होणे, हे सुरक्षा दलांचे मोठे यश आहे. या घटनेमुळे संवेदनशील ठिकाणीही शस्त्रे कसे लपवून ठेवली जाऊ शकतात, हे स्पष्ट झाले आहे.श्रीनगर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन सखोल चौकशी सुरू केली आहे.



## प्रधानमंत्री मोदी पदाची प्रतिष्ठा राखण्यात अपयशी : प्रियांका गांधी

**कटिहार :** काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियांका गांधी वड्रा यांनी शुक्रवारी बिहारमधील कटिहार येथील निवडणूक रॅलीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. त्या म्हणाल्या की, काँग्रेस पक्ष महात्मा गांधींनी अन्याय आणि फुटीरतावादी धोरणांविरुद्ध जो संघर्ष केला होता तोच संघर्ष करत आहे. प्रियांका गांधी यांनी आरोप केला की प्रधानमंत्री मोदी देशातील सर्व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (PSU) त्यांच्या काही कॉर्पोरेट मित्रांना देत आहेत, ज्यामुळे सर्वसामान्यांचे नुकसान होत आहे. त्या म्हणाल्या, 'प्रधानमंत्री सार्वजनिक मालमत्ता काही निवडक उद्योगपतींना देत आहेत, तर देशातील सामान्य जनता भाडे देत आहे. 'प्रधानमंत्र्यांच्या अलिकडच्या भाषणांवर प्रतिक्रिया देताना प्रियांका गांधी म्हणाल्या की, प्रधानमंत्री मोदी त्यांच्या पदाची प्रतिष्ठा राखण्यात अपयशी ठरले आहेत. प्रधानमंत्र्यांनी लोकांना भडकवण्यासाठी 'कट्टा' सारखे शब्द वापरल्याबद्दल त्यांनी टीका केली. देशातील सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीने संयम आणि शिष्टाचार राखला पाहिजे यावर प्रियांका गांधी यांनी भर दिला. रॅलीदरम्यान प्रियांका गांधी यांनी जनतेला बिहारमधील आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला पाठिंबा देण्याचे आवाहनही केले.



## एसटी कर्मचाऱ्यांचा रखडलेला पगार अखेर सोमवारी खात्यात जमा होणार...

**मुंबई :** राज्य सरकारने एसटी महामंडळाला सवलतमूल्याचा निधी न दिल्याने एसटी कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात पगार जमा होऊ शकलेला नाही. दर महिन्याच्या 7 तारखेला कर्मचाऱ्यांना पगार मिळतो. परंतु, सवलतमूल्याची रक्कम मिळण्यास विलंब झाल्याने एसटी कर्मचाऱ्यांचा पगार रखडला. आता राज्य सरकारने एसटी महामंडळाला सप्टेंबर 2025 च्या सवलतमूल्याच्या प्रतिपूर्तीपोटी 471.05 कोटी रुपये निधी वितरित करण्यास गृह विभागाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात सोमवारी पगार जमा होईल, असे सूत्रांनी सांगितले. एसटी महामंडळाच्या माध्यमातून प्रवास करणाऱ्या राज्यातील हजारो प्रवाशांसाठी विविध सवलती योजना आहेत. या योजनांच्या माध्यमातून प्रवासी तिकीट दरात 33 टक्क्यांपासून 100 टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येते. यात ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत तिकीट भाडे, महिलांसाठी अर्धे तिकीट योजनेचा समावेश आहे. या सवलतींचे उत्तरदायित्व राज्य सरकारचे आहे. त्यामुळे 67 टक्के ते पूर्णपणे तिकीटाचे भाडे राज्य सरकार भरते. एसटी महामंडळाला सप्टेंबर 2025 च्या सवलतमूल्याच्या प्रतिपूर्तीपोटी 471.05 कोटी रुपये इतका निधी देण्यात येणार आहे. याद्वारे एसटी महामंडळातील सुमारे 83 हजार कर्मचाऱ्यांच्या ऑक्टोबर महिन्यातील वेतनाचा प्रश्न सुटला आहे. परंतु, बँक खात्यात सोमवारी वेतन जमा होणार असल्याने तूर्तास अनेक एसटी कर्मचाऱ्यांना विविध हफ्ते भरण्यासाठी खटाटोप करावा लागत आहे.

## आरक्षणाच्या मुद्द्यावरून सामाजिक एकतेची वीण उसवली : शरद पवार



**अकोला :** राज्यात आरक्षणाच्या मुद्द्यावरून सामाजिक एकतेची वीण उसवली. मराठा आणि ओबीसींमध्ये अंतर निर्माण झाले. कष्टकरी शेतकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. आरक्षण आवश्यक आहेच, मात्र समाजात कटूता व दुरावा नको, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) अध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री शरद पवार यांनी आज येथे मांडली. अकोल्यात किसान ब्रिगेडद्वारे आयोजित शेतकरी संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री अनिल देशमुख, हर्षवर्धन देशमुख, किसान ब्रिगेडचे अध्यक्ष प्रकाश पोहरे, अजहर हुसेन, माजी आमदार लक्ष्मणराव तायडे, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोष कोरपे, अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीष धोत्रे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे, महादेवराव भुईभार आदी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमात शरद पवार यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले. पुढे शरद पवार म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज सर्वांच्या अंतःकरणात आहेत. शिवाजी महाराजांचे रयतेचे राज्य होते. त्यांच्या सैन्य दलात सर्व जातीचे सैनिक होते. मुस्लिमही मोठ्या संख्येने होते. आज राज्यातील काही जिल्ह्यात वेगळे वातावरण आहे. विशेषतः मराठवाड्यातील वातावरण बिघडत आहे. मराठा आणि ओबीसींमध्ये अंतर निर्माण झाले. समाजातील एकतेची वीण उसवली. आरक्षणाचा आग्रह करणाऱ्या मराठा व ओबीसींमध्ये कटूता निर्माण झाली आहे. कष्टकऱ्यांचे जीवन उद्ध्वस्त झाले. आरक्षण आवश्यक आहेच, मात्र कटूता व दुरावा नको. त्या दृष्टीने प्रयत्न आवश्यक आहेत. कृषी क्षेत्राची परिस्थिती आज बदलली आहे. लोकसंख्या जास्त होत असताना शेती कमी होत आहे. विकास कामांसाठी शेतीची जमीन घेतली जाते. दिवसेंदिवस जमीन कमी-कमी होत आहे. त्यातून शेतीवर बोजा वाढला. तो बोजा कमी करण्याची गरज आहे. घरातील दोनपैकी एका मुलाने शेतकरी केली पाहिजे. उत्पादन व खर्चाचा विचार होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाला योग्य मोबदला मिळाला पाहिजे, हीच शासनाची भूमिका असावी, असे शरद पवार म्हणाले.

## मनोज जरांगेंना मुंबई पोलिसांचे समन्स



**मुंबई :** मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. मुंबई पोलिसांनी जरांगे-पाटील आणि त्यांच्यासह इतर पाच जणांना आझाद मैदान पोलीस ठाण्यात तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचे समन्स बजावले आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्यावर आझाद मैदानावरील उपोषणदरम्यान नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे समन्स जरांगे पाटील यांनी आझाद मैदानात केलेल्या उपोषणादरम्यान झालेल्या कथित उल्लंघनांशी संबंधित आहेत. जरांगे-पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर आझाद मैदानावरील आंदोलनादरम्यान पोलिसांनी घालून दिलेल्या नियम आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. समन्समध्ये मनोज जरांगे-पाटील आणि इतर पाच जणांना 10 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 ते दुपारी 1 वाजेच्या दरम्यान आझाद मैदान पोलिस स्टेशनमधील तपास अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. पोलिसांच्या या कारवाईमुळे मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचे आणि जरांगे-पाटील यांच्या पुढील राजकीय वाटचालीचे कायदेशीर आव्हान वाढले आहे. या समन्सवर जरांगे-पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांची पुढील भूमिका काय असेल? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

स्मृतिशेष शीला अंकुशराव गणवीर



यांच्या 1 पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन....



मृत्यू : 9/11/2024

: अभिवादक :

पती – अंकुश बापुराव गणवीर, मुले – सतीश अंकुशराव गणवीर, रोहीनी सतीश गणवीर, शरद अंकुशराव गणवीर, रिना शरद गणवीर, मुलगी – प्रिया अमोल बहादुरे, नातवंड : स्वरांनजली, सृष्टी, दीक्षीता आणि मनस्वी (चुटकी), समस्त गणवीर परिवार.

मेधावी सुमेध रंगारी

६ व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा






जन्म दि. 09 नोव्हेंबर 2019

शुभेच्छुक :
तुलसीदास रंगारी (दादू)
संगीता रंगारी (दादी)
सुमेध रंगारी (पप्पा)
सीमा रंगारी (मम्मी)
मो. ९४०५१२६४६८

बहुजन सौरभ

बुद्ध विहार समन्वय समिती खामला नागपूर द्वारा संचालित 'समन्वय मॅरेज ब्युरो'




विवाह जोडणी उपक्रम

विवाहोच्छुकांसाठी

ऑनलाईन नोंदणी :
http://samanwaymarriagebuero.com



तसेच वधु-वर परिचय मेळावा 21/12/25

: संपर्क :

दामोदर लोखंडे 7038902608, सिद्धार्थ खोब्रागडे 9423122375, ए.के. पाटील 7972987584





# महिला विश्वचषकाचा विजय, पण महिलांचा पुरुषांविरुद्ध विजय अजून बाकी आहे…

महिला क्रिकेट संघाने नुकताच महिलांच्या विश्वचषकात अभूतपूर्व पराक्रम केला. संपूर्ण देशभर जल्लोष, अभिनंदन आणि कौतुकाचा वर्षाव झाला. ‘भारतीय महिलांनी पुरुषांच्या तोडीस तोड पराक्रम केला’ अशा मथळ्यांनी माध्यमे गाजली.

हा पराक्रम निश्चितच गौरवाचा क्षण आहे, परंतु या विजयाच्या आनंदात आपण समाजातील अदृश्य असमानतेकडे पाहतो आहोत का?

मैदानावर विजय मिळवलेल्या महिलांना समाजाच्या अन्यायाच्या रणांगणात अजूनही लढावे लागते, हेच सत्य आहे. मैदानाबाहेर वास्तव वेगळे आहे. पोस्ट-ग्रॅज्युएट शिक्षण घेतलेली माधवी माझ्या कार्यालयात आली होती. आदिवासी समाजातील एक हुशार युवती. तिचे लग्न एका सरकारी अधिकाऱ्याशी झाले होते, तोही आदिवासी. पण तिचे वैवाहिक आयुष्य म्हणजे अपमान, अत्याचार आणि बाहेरख्यालीपणाची यातना. सततचा मानसिक छळ आणि मारझोड!

शेवटी तिने पोलिसांत तक्रार दाखल केली. पतीने दुसरा विवाह करून दुसऱ्या स्त्रीबरोबर राहण्याचे आणि त्यांना दोन मुले असल्याचे तिने दस्तऐवजी पुरावे सादर केले. प्राथमिक आरोग्य केंद्रातील त्या मुलांच्या नोंदीही त्याच्या नावावर होत्या. मी तिला सल्ला दिला की हा प्रकार कर्मचाऱ्याच्या गैरवर्तनाचा आहे आणि अर्ज लिहून दिला. माधवीने संबंधित खात्याला अर्ज केला - ‘तुमचा कर्मचारी आहे; महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियमांनुसार, पत्नी हयात असताना दुसरे लग्न करणे ही गैरवर्तणूक आहे. त्याच्यावर कारवाई व्हावी.’ पण खात्याचे उत्तर आले,

‘हे आमचे काम नाही. हा तुमचा कौटुंबिक वाद आहे.’

‘त्याने दुसरी बायको केली, तुही दुसरा कर.’

‘हे तर चालतच असते.’ ही होती प्रशासकीय उदासीनतेची आणि स्त्रीविषयक असंवेदनशीलतेची पराकाष्ठा. असे उत्तर ऐकल्यावर आम्ही वरिष्ठांकडे तक्रार करण्याचा सल्ला दिला. मग भीतीपोटी प्राथमिक चौकशी सुरू झाली. चौकशीत माधवीचा अपमान झाला. अधिकारी तिला विचारतो, ‘तुझे नाव काय?’

ती म्हणाली, ‘माधवी सखाराम तडवी.’

अधिकारी भडकला, ‘लग्न झालेय तरी नवऱ्याचे नाव घेत नाहीस? मग तुझे लग्न झाले कसे समजावे?’ ही केवळ अज्ञानाची नव्हे तर पुरुषसत्ताक मानसिकतेची पराकाष्ठा आहे. स्त्रीला स्वतःचे नाव, ओळख आणि अस्तित्व ठरवण्याचा हक्क आहे. ती लग्नानंतर वडिलांचे आडनाव ठेवू शकते, नवऱ्याचे घेऊ शकते, किंवा दोन्ही वापरू शकते. हा तिचा संविधानिक हक्क आहे, जो अनुच्छेद 21 नुसार दिला आहे. पण आजही समाजात ‘विवाहित स्त्री म्हणजे नवऱ्याचे आडनाव घेणारी असलीच पाहिजे’, ‘मंगळसूत्र घालायचेच’ असा जुना विचार अजूनही घट्ट बसलेला आहे. हाच स्त्री-स्वातंत्र्याचा मूळ अडथळा आहे. कायदे आणि त्यांची अंमलबजावणी करताना वास्तवात ढिलाई केली जाते.

महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम स्पष्ट सांगतात, सरकारी कर्मचाऱ्याला पहिले लग्न हयात असताना दुसरा विवाह करता येत नाही. हे केल्यास ती गैरवर्तणूक मानली जाते आणि शिक्षा देता येते, अगदी नोकरीतून बरखास्तीपर्यंत.पण वास्तवात काय होते? अनेक खात्यांमध्ये अशी प्रकरणे ‘कौटुंबिक वाद’ म्हणून बाजूला ढकलली जातात. पुरावे असले तरी प्रशासन ‘हे आमचे काम नाही’ म्हणते, चौकशी ढकलते आणि अखेरीस अन्याय स्त्रीच्या वाट्याला येतो. ही प्रणाली स्त्रीविरोधी वर्तनाला अप्रत्यक्षपणे समर्थन देते. स्त्रीचे नाव, जात आणि ओळखीचे प्रश्न, अद्याप अनुत्तरित आहेत. अनेक मातांना आपल्या मुलांच्या जातीच्या दाखल्यासाठी वडिलांचा पुरावा लागतो. पण जर वडील सहकार्य करत नसतील, तर त्या मुलांना जातीचा दाखला मिळत नाही.

संविधान समानतेची हमी देते (कलम 14, 15), पण प्रत्यक्षात ती महिलांपर्यंत पोहोचली नाही. आईच्या दाखल्यावरून जातीचा दाखला मिळावा हे हक्काचे सुधारक पाऊल अजून बाकी आहे. हे दाखवते की मातृत्वाची जबाबदारी स्वीकारली जाते, पण अधिकारांना अजून मान्यता नाही. महिला क्रिकेट संघाचा विजय प्रतिकात्मक समानतेचे प्रतीक आहे. तो विजय दर्शवतो की स्त्रिया सक्षम, प्रतिभावंत आणि जिद्दी आहेत. पण माधवीसारख्या महिलांच्या कथा वास्तवातील असमानतेचे दर्शन घडवतात. त्यांना अजूनही न्याय, सन्मान आणि ओळख मिळवण्यासाठी लढावे लागते.



अनिल वैद्य
माजी न्यायाधिश
9657758555

कायद्यातील समानता कागदावर आहे, पण तिचे वास्तवात रूपांतर झालेले नाही. हीच खरी लढाई आहे. मैदानाबाहेरची, अन्यायाविरुद्धची आणि अस्तित्वासाठीची. महिलांच्या तक्रारींना निश्चित वेळेत उत्तर देणं बंधनकारक असावे. आईच्या दाखल्यावर जाती प्रमाणपत्र देण्याचा अधिकार कायद्यात स्पष्ट असावा. शाळांपासूनच महिलांच्या नाव, स्वातंत्र्य आणि हक्कांविषयी शिक्षण देणे आवश्यक आहे. संविधानातील कलम 14, 15, आणि 21 यांचा जनजागरण मोहिमांच्या रूपात प्रचार होणे गरजेचे आहे. महिलांचा क्रिकेटमधील विजय आणि आयुष्यातील पराभव, हा विरोधाभास अजूनही कायम आहे. एकीकडे मैदानावर भारतीय महिला विश्वविजेती बनतात, तर दुसरीकडे एखादी माधवी तिच्या अधिकारांसाठी दारोदार फिरते. हे दृश्य आपल्याला विचारायला भाग पाडते. आपण खरोखर स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने चाललो आहोत का? की अजूनही केवळ प्रतीकात्मक जयजयकार करत आहोत? खरा विजय अजून बाकी आहे! महिला क्रिकेट संघाने देशाचा सन्मान वाढवला. हा अभिमानाचा क्षण आहे. पण समाजातील माधवीसारख्या स्त्रियांचा संघर्ष सांगतो की खरा विजय अजून बाकी आहे. तो दिवस खरा विजयाचा ठरेल. जेव्हा कोणत्याही महिलेला स्वतःचे नाव ठेवण्यासाठी किंवा न्यायासाठी लढण्यासाठी समाजाची परवानगी घ्यावी लागणार नाही. त्या दिवशीच महिलांनी केवळ विश्वचषक नव्हे, तर जगण्याचे स्वातंत्र्यही जिंकले असे म्हणता येईल. महिला क्रिकेटचा विश्वविजय हा केवळ खेळाचा पराक्रम नाही, तर स्त्रीशक्तीच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे.

पण मैदानाबाहेर अजूनही महिलांना अन्यायाच्या सीमारेषा ओलांडायच्या आहेत. समाज, प्रशासन आणि कायदा यांनी मिळून या सीमारेषा मिटवल्या तरच भारताला खऱ्या अर्थाने समानतेचा विश्वविजेता म्हणता येईल. ‘स्त्री-स्वातंत्र्य’ हे शब्द अनेकांना केवळ एक सामाजिक किंवा स्त्रीवादी आंदोलनाचा विषय वाटतात. पण खरे पाहता, हा प्रश्न केवळ महिलांचा नाही. तो समाजाच्या सभ्यतेचा, संस्कृतीच्या प्रगल्भतेचा आणि लोकशाहीच्या मूल्यांचा आहे. स्वातंत्र्य म्हणजे फक्त कायदेशीर हक्क नव्हे; ते विचार, निर्णय आणि अस्तित्वाचा सन्मान आहे.

स्त्री-स्वातंत्र्यासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी हे मुद्दे समाजात रुजवले पाहिजेत. स्त्रीवादी लेखकांनी निव्वळ भाषा-सौंदर्याचे प्रदर्शन न करता, या कळीच्या मुद्द्यांवर भाष्य केले पाहिजे. ■ ■

# ‘माझी कूस आभाळाची’
## स्त्रीअस्तित्वाच्या शोधाचा संवेदनशील आविष्कार

स्त्री मनाचा वाळवंट झालेला प्रदेश, तिच्या वेदना आणि आत्मसाक्षात्काराचा प्रवास, हे माधुरी वसंतशोभा यांच्या ‘माझी कूस आभाळाची’ या कवितासंग्रहाचे मूलभूत अधिष्ठान आहे. स्त्रीला माणूस म्हणून मान्यता देण्याची लढाई, तिच्या देह-संवेदना आणि मनस्वातंत्र्य यांचा अंतर्मुख शोध या संग्रहातून प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. कवयित्रीने स्त्रीच्या जाणिवेला पुरुषसत्ताक व्यवस्थेला धडक देणाऱ्या भाषेत मांडले आहे. ती भाषेत कोठेही आक्रस्ताळी नाही, पण ठाम आहे. तिचा शब्दसंग्रह साधा असला, तरी अर्थगर्भ आणि आशयधन आहे. ती म्हणते, ‘मी कितीही उंच भरारी घेतली…’ या ओळींतील भिंती तिच्या स्वातंत्र्याच्या मर्यादा ठरवतात. येथे ‘अहं’ हा केवळ गर्वाचा नकार नव्हे, तर आत्मजाणीवेचा ध्वनी आहे–स्वाभिमान आणि आंतरिक विरोधाचा स्वर. या कवितासंग्रहातील वैशिष्ट्य म्हणजे कवयित्रीची विचारशीलता आणि तर्कशुद्ध प्रगल्भता. ती स्त्रीयुक्तीला केवळ वेदनेच्या चौकटीत न ठेवता विज्ञानवादाशी जोडते. मासिक पाळीच्या कवितेत ती धार्मिक, सामाजिक विटाळाच्या संकल्पनेला तर्काच्या कसोटीवर तोलते. ‘मासिक पाळी’ ही विटाळ नव्हे, तर सृजनाची प्रक्रिया आहे, असे सांगताना कवयित्री स्त्रीत्वाच्या जैविक वास्तवाला सामाजिक बंधनांतून मुक्त करते. येथे तिची भूमिका केवळ बंडखोर नाही, तर वैज्ञानिक दृष्टिकोनाची प्रतिध्वनी आहे. ‘मी झाड होऊ का?’ या कवितेतून कवयित्री नैसर्गिक उपमेद्वारे आत्मस्वर शोधते. झाडाचे प्रतिमाविश्व हे तिचे एक महत्त्वाचे प्रतिक आहे. रूजणे, वाढणे, सावली देणे, घरटे बनणे आणि शेवटी मुक्ततेकडे झेप घेणे. या रूपकांमधून स्त्रीच्या सृजनशीलतेची आणि सहनशक्तीची उक्ती व्यक्त होते. विशेष म्हणजे या कवितांमध्ये ‘मी’ आणि ‘ती’ यांचा भावनिक संवाद आपल्याला सामाजिक विकासावरील प्रश्नांकडे घेऊन जातो. कवयित्रीच्या मते, ‘कविता म्हणजे बंड नाही, तर माणसाच्या माणूसपणाला जपणारी श्वासाची प्रक्रिया.’ ‘खरी कविता माणसांचीच असते’- असे ती म्हणते. ही ओळ तिच्या कविताशैलीचा सारांश आहे. ती माणसांतला बुद्ध शोधते, माणसाच्या गावात गजबजलेले विवेकाचे अस्तित्व पुन्हा उभे करते. तिच्या कवितांतील आशावाद हा केवळ भावनिक नाही; तो विचारांचा ऊन आहे, जो काळोखाच्या सामाजिक विळख्यातही प्रकाश सुचवतो.



‘माझी कूस आभाळाची’ हा संग्रह स्त्रीवाद, अस्तित्ववाद आणि विज्ञानवाद या तिहेरी प्रवाहांतून वाहतो. स्त्रीच्या देहाला देहाधारित न ठेवता तिच्या विचारस्वातंत्र्याला आधार देणारे हे लेखन मराठी कवितेत नव्या जाणीवेची पालवी फुलवते. या संग्रहातील कोणत्याही कवितेला शीर्षक नाही, हेही कवयित्रीच्या विचारस्वातंत्र्याचे सूचक आहे. जणू प्रत्येक कविता ही स्वतःचा परिचय स्वतः ठरवणारी स्वतंत्र व्यक्ती आहे. संग्रहातील शेवटच्या ओळी, ‘माझीही कविता वठलेल्या झाडाचे दुःख घेऊन उगवत असली, तरी तिचे हिरवे झाड व्हावे हे स्वप्न मी उराशी बाळगून आहे. कारण माझी कूस आभाळाची आहे.’ या कवयित्रीच्या संपूर्ण काव्यविश्वाचा आत्मसार आहेत. त्या ओळींमधील ‘आभाळ’ हे स्त्रीच्या मर्यादा तोडणाऱ्या आकांक्षेचं प्रतीक आहे. ‘माझी कूस आभाळाची’ हा कवितासंग्रह म्हणजे भावनात्मक ऊर्जेचा आणि वैचारिक सुस्पष्टतेचा संगम आहे. माधुरी वसंतशोभा यांनी केवळ स्त्रीवादी नव्हे, तर मानवतावादी दृष्टिकोनातून कविता मांडली आहे. शब्दांच्या पार्श्वभूमीवर उभे राहिलेले हे स्त्रीस्वातंत्र्य म्हणजे आधुनिक मराठी कवितेत उमलत असलेले नवफुल.

प्रविण पवार
मो. 9689616684

पुस्तक माहिती

पुस्तकाचे नाव - माझी कूस आभाळाची
कवयित्री - माधुरी वसंतशोभा
साहित्य प्रकार - कविता (संग्रह)
प्रकाशक - संवेदना प्रकाशन
प्रथम आवृत्ती - 27 एप्रिल 2025
मूल्य - रूपये 150/-
मो. 9049329350 ■ ■

# सामाजिक परिवर्तन घडविणारी कादंबरी, ‘कांची’

सामाजिक कार्यकर्त्या म्हणून परिचित असणाऱ्या विद्या भोरजारे कादंबरीकार पण आहेत. ‘कांची’ ही कादंबरी विद्या भोरजारे यांचीच आहे. सव्वा तीनशे पानात स्त्रीच्या जन्माचे आणि जगण्याचे अनेक पट लेखिका उलगडताना दिसतात. आजवर वेगवेगळ्या अंगाने स्त्रीचे जगणे हे दुर्लक्षित राहिले आहे. त्यातील अनेक बाबींचा बोलका चलपट या कादंबरीच्या रूपाने आपल्यापुढे उपस्थित होतो आणि आपण अगदी गांगरून जातो की, हे काय घडतेय? एवढी ही एका स्त्रीची विटंबना योग्य नव्हे! कादंबरी वाचताना एक बाब प्रकर्षाने जाणवते ती ही की, प्रत्येक स्त्रीला ही कादंबरी जणू आपलीच कहाणी असावी, अशी जवळीकता निर्माण करते. स्त्रीच्या दुःखाचे विविध पट या कादंबरीतून व्यक्त झालेले आहे. स्त्रीचा जन्म म्हणजे एक अंधार युग की काय, असे एक क्षण वाटून जाते.कांचनकांती जी एक प्रसिद्ध नृत्यांगणा आहे. सुस्वरूप, सालस, मनमिळावू, सुशील, नम्र, सुंदर आणि समंजस देखील आहे. ती सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व असताना देखील तिच्यात आपल्याला अहंगड दिसत नाही. प्रसिद्धीच्या शिखरावर असणारी ही कांचनकांती पुढे लग्नानंतर केवळ हवालदिल कांची बनून राहते. जी एखाद्या चेंडूसारखी नवऱ्याच्या ठोकरांनी फक्त इकडे तिकडे टोलावल्या जाते. तिची होणारी फरपट सर्वार्थाने लेखिकेने अतिशय सशक्तपणे मांडली आहे. अनेक मुलींचे जीवन असेच असते. लग्नानंतर जीवनात कलाटणी मिळते आणि तिची कुशाग्रता पूर्णपणे धुळीस मिसळते. ती केवळ एक कळसूत्री बाहुली बनवून राहते. यातील कथा पुढे जाते तस-तसे आपण त्यात गुंतत जातो, हे गुंतने लेखिकेची भाषाशैली परिणामकारक असण्याचे प्रमाण देते. लेखिकेने कथानक उभे करताना पात्रानुसार त्यांच्या तोंडी दिलेले संवाद त्या पात्राला शोभणारे, स्वभाव गुणधर्म व्यक्त करणारे आणि त्यांच्या तोंडी चपखल बसणारे दिलेले आहेत. खरे म्हणजे ती पात्र उभे करण्यासाठी बोलके करण्यासाठी ज्या ताकतीने लेखिकेने ते उभे केले त्यामुळे आपण खरे तर गुंततो. भाषा फारच अस्खलित आहे. त्यामुळे वाचकांवरची पकड कायम राहते. सोबतच कथानक पुढे जाताना पुढे काय… पुढे काय… ते रहस्य आपली उत्कंठा वाढवते. त्यामुळे ही कादंबरी सोडावीशी वाटत नाही. कारण याची सुरुवात फ्लॅशबॅक ने झालेली आहे. कुठेही तोच तोचपणा आलेला नाही. संवाद देखील फार नवीन आणि परिस्थितीनुसार वेगवेगळ्या शब्दांची निवड, त्यामुळे कादंबरी लिहीतांना खरा कस लागलेला दिसतो.



विद्या भोरजारे

कांची हे मुख्यपात्र विदर्भातील असल्याने वैदर्भीय भाषा देखील असल्याने बोलीभाषेचा गोडवा मन जिंकून घेतो. समर्पक शब्दाची निवड ही वेळोवेळी जाणवते ते हे खरे लेखिकेचे बलस्थान वाटते. ही कादंबरी वाचताना अधिक जास्त भावते, ती कांचीच्या रूपाने बोलू लागलेली एक तर्कसंगत, विज्ञाननिष्ठ आणि परखड आपले मत मांडणारी बौद्ध स्त्री असल्यामुळे. आपसुकच आंबेडकरी चळवळीशी जुळल्या गेलेली नाळ त्यामुळे तिच्यावर एकंदरीत स्वातंत्र्याचा आणि समतेचा झालेला संस्कार पुढे येतो. तिच्या तोंडी घातलेले वाक्य हे आंबेडकरी समाजाविषयी जी बाह्य जगतात असणारी भ्रामक माहिति आणि चुकीचा समज आहे. त्यावर परखडपणे ताशेरे ओढते आणि म्हणूनच खरीखुरी तीच माहिती पुढे येते. त्यामुळे समाजाविषयी असणारे पूर्वग्रह बाजूला सारता येतात.यातून तिचा खमकेपणा ही जाणवतोय आणि म्हणून वाचकाला हे जास्त अपील होते की ही दुःखाला लाथाडते आणि स्वतःतील दडलेली अतिशय हुशार, कर्तबगार आणि कर्तृत्ववान स्त्री बाहेर पडते. संकटाचे पहाड पार करून ती शेवटी विजयी ठरते आणि नवी उभारी घेते. कांची ही कादंबरी जीवनाचे दुःख, संघर्ष आणि उभारी घेऊन साहित्यात उतरली आहे. कांची म्हणजे समाजाचे दर्शन घडवणारी साहित्यकृती होय. सामाजिक परिवर्तनाकरता ही कादंबरी पुरुषांनी देखील वाचावी. कारण तेव्हाच तर माणसाच्या स्वभावातील खरा स्वभाव प्रगट होतो. त्यात स्वतःला बघता येते. ही कादंबरी वास्तवदर्शी आणि मन हेलावून सोडणारी आहे. कांची हे शीर्षक आपणास कथानकाच्या अधिक जवळ घेऊन जाते.

कर्तबगार स्त्री आपली जोडीदार असेल तर ही सुखाची बाब होय, हे सांगायला लेखिका विसरलेली नाही. हा एक विचार सर्वत्र दिसतो. परिवर्तनाचे साहित्य म्हणून कांची कादंबरीकडे बघता येते. का कादंबरीचे मुखपृष्ठ प्रा. भाऊ दांदडे, नागपूर यांनी तयार केले आहे. त्यामुळे त्यांच्या कल्पकतेची छाप पडल्यावाचून राहत नाही. मुखपृष्ठ पाहताच केंद्रस्थानी स्त्री पात्र आणि पुढे विहीर बघतास आपल्या डोक्यातील रसायन हलते आणि अनेक प्रश्न डोक्याचा ताबा घेतात. त्यामुळे कुठेतरी मुखपृष्ठ हे फारच बोलके झाले आहे हे लक्षात येते. पुस्तक हातात उचलून घ्यावे असे प्रभावी मुखपृष्ठ आणि त्यातील रंगसंगती त्यामुळे एकंदरीतच परिणाम, मुखपृष्ठ बघताच जाणवते आणि पुस्तक चाळण्याची इच्छा होते, ही जमेची बाब आहे. पुस्तकाची बांधणी अक्षरांचा फॉन्ट चांगला आहे. पुस्तकासाठी कागद उत्तम वापरलेला आहे. जरा शुद्धलेखनाच्या किरकोळ चुका आढळून येतात आहे. लेखिकेने हिंदी भाषेचा बऱ्याच ठिकाणी वापर केला आहे. मात्र ते तपासून घ्यायला हवे होते, जेणेकरून त्यातील चुका कमी करता आल्या असत्या. कांची कादंबरीचा शेवट देखील अतिशय परिणामकारक आहे. ज्आंबेडकरी स्त्री लेखिका आता सर्वत्र सर्वच साहित्यप्रकार हाताळायला लागलेली आहे. कारण हे साहित्य परिवर्तनाचे प्रभावी माध्यम होय. अशा सकस साहित्यकृती येण्याची वाचकांना देखील प्रतिक्षा असते. लेखिकेचे तिच्या या उत्तम साहित्यकृती करिता अभिनंदन आणि पुढील लेखनाकरता सदिच्छा! साहित्य जगतात कांची कादंबरीचे मनापासून स्वागत. ■ ■

सुषमा पाखरे
मो. 8788248926

# टोमणे मारून कुणी बदलत नाही !

बौद्ध कार्यकर्ता सर्व समाजाला जोडण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. परंतु त्याला पाहिजे तसे यश आले नाही. त्यामुळे तो निराश झाला. निराशेत तो मातंग, चर्मकार, भंगी, खाटीक, आदिवासी, ओबीसी यांचेवर चिडतो. चिडून उपयोग होत नाही हे त्याला कळत नाही. मग तो त्यांनाच शत्रू मानायला लागतो. अशा प्रकारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम आपणच सोपे करून टाकतो. संघाला विरोध करायचा आणि समदुःखी लोकांचा पाणउतारा करायचा हे आपले प्रबोधन कार्य आहे असे मानत जायचे. काहीही असो पद्धती जरी चूक असली तरी मानसिकता मात्र कल्याणकारी आहे. समाज बदलला पाहिजे, राज्यक्रांती झाली पाहिजे. आपण सर्व समदुःखी लोक एकत्र आले पाहिजे असे बौद्ध कार्यकर्त्याला प्रामाणिकपणे वाटते.

**काही पाळल्या तर बदल होईल :-** चिडून कुणालाच ताने मारू नका. उलट त्याला समजेल, रुचेल अशी भाषा बोला. मैत्री करून तर्क करा. त्याला त्याच्या शक्तीची जाणीव करून द्या. शक्तीचा उपयोग न केल्याने झालेली आणि होत असलेली हानी समजून सांगा. आपण असेच झोपेत राहिलो तर काय नुकसान होईल ते सांगा. अनेक अनेक वेळा सांगा. आपण सांगतो ते जर सत्य असेल आणि त्याचे हिताचे असेल तर सांगणे सुरूच ठेवा. थकून जाऊ नका.



भगवान बुद्ध दोन नविन भिक्खुंसोबत संवाद करतात….

बुद्ध विचारतात, ‘भंते, मी जो विशुद्धीचा मार्ग तुम्हाला सांगितला त्याने तुमचे कल्याण होईल का?’

भंते म्हणतात, ‘होय भगवान’.

बुद्ध विचारतात, ‘या मार्गाने जगाचे कल्याण होईल का?’

भंते म्हणतात, ‘होय भगवान.’

बुद्ध म्हणतात, ‘मग आता तुम्ही शेजारच्या गावात जा आणि दुःखी कष्टी लोकांना दुःख मुक्तीचा मार्ग समजून सांगा.’

‘होय भगवान.’

भंते शेजारचे गावात जातात. मोठा दरवाजा म्हणजे कमान असते. तेथे एक भुकेलेला माणूस दुःखी कष्टी होऊन बसलेला असतो. भंते आपसात बोलतात, हा व्यक्ती फार दुःखी आहे. याला आपण दुःख मुक्तीचा मार्ग सांगितला तर बरे होईल.

असे म्हणून त्याला म्हणतात, ‘हे उपासक! तू फार दुःखी कष्टी वाटतोस.’

तो म्हणतो, ‘होय भंते.’

‘मग आता काळजी करू नकोस. भगवान बुद्धांनी मोठ्या त्यागाने आणि तपश्चर्येने मानवाच्या दुःख मुक्तीचा मार्ग शोधून काढला. आम्ही तो तुला सांगतो. तो तू नीट ऐक.’

तो भुकेला, दुःखी माणूस म्हणाला, ‘भंते, आपण म्हणता ते खरे असू शकते. पण मला खूप भूक लागली. प्रथम तुम्ही मला भाकर द्या मग मार्ग सांगा.’

भंते चिडतात. ‘अरे बुद्धाने घरदार, बायको मुलगा, माय-बाप आणि राज्य सोडले आणि तप करून त्यांनी हा मार्ग शोधून काढला. तो मार्ग न ऐकता तू भाकर मागून राहिलास. किती अज्ञानी आहेस तू?’

असे म्हणून ते बुद्धाकडे परत येतात आणि घडले ते सांगतात. भगवान बुद्ध त्यांना परत प्रश्न विचारतात, ‘भंते, या मार्गाने तुमचे कल्याण होईल?’

‘होय भगवान.’

‘या मार्गाने त्याचे कल्याण होईल?’

‘होय भगवान.’

‘या मार्गाने जगाचे कल्याण होईल?’

‘होय भगवान.’

‘मग पुन्हा जाऊन त्याला धम्म सांगा.’

‘जशी आज्ञा भगवान’ म्हणून दुसऱ्या दिवशी परत जातात. तो माणूस आळशी असल्याने तेथेच बसून होता. भंते त्याला परत सांगतात, ‘हे उपासक! आज परत आम्ही तुला दुःख मुक्तीचा मार्ग सांगायला आलो, तो तू ध्यान देऊन ऐक.’ तो म्हणाला, ‘भंते, प्रथम मला भाकर द्या. नंतर धम्म सांगा.’

भिक्खू परत येतात आणि भगवान बुद्धाला घडले ते सांगतात. बुद्ध त्यांना तिसऱ्यांदा तेच प्रश्न विचारतात आणि तिसऱ्या दिवशी देखील पाठवतात. भंते जातात आणि त्याला नेहमी प्रमाणे तेच म्हणतात.

तो म्हणाला, ‘भंते आता मला तुमचा फार राग आला. मी तुम्हाला इजा पोहचवेल त्यापूर्वी तुम्ही निघून जा. मी किती वेळा सांगितले मला प्रथम भाकर द्या. मग तुम्ही काय सांगायचे ते सांगा.’

भिक्खू निराश होऊन भगवंताकडे परत येतात आणि घडले ते सांगतात.

भगवान बुद्ध त्यांना परत तेच प्रश्न विचारतात, ‘भिक्खुनो, या मार्गाने तुमचे, त्याचे, जगाचे कल्याण होईल?’

भिक्खू म्हणतात, ‘होय भंते.’

बुद्ध म्हणतात, ‘परत जा आणि त्याला धम्म सांगा.’

भिक्खू म्हणतात, ‘आता क्षमा असावी. तो आम्हाला मारेल. तो ऐकणार नाही.’

भगवान बुद्ध म्हणतात, ‘भिक्खुनो, जर तुम्हाला असे वाटत असेल की या मार्गाने तुमचे, त्याचे, जगाचे कल्याण होईल तर तुम्ही त्यांना एक वेळ सांगा. एक वेळ सांगून ऐकत नसेल तर दोन वेळा सांगा. दोन वेळा सांगून ऐकत नसेल तर तीन वेळा सांगा. तीन वेळा सांगून ऐकत नसेल तर सात वेळा सांगा. सात वेळा सांगून ऐकत नसेल तर साताचा घण म्हणजे सात गुणेला सात इतके वेळा सांगा. इतके वेळा सांगून ऐकत नसेल तर तुम्ही मात्र त्या मार्गाने चालतच राहा.’ हा उपदेश आपल्याला या विषयावर लागू पडतो. मांग, चांभार, भंगी, खाटीक, आदिवासी आणि ओबीसी यांचे काल्याण जाती अंताचे लढ्यात आणि भाजप - राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या ब्राम्हणशाही व भांडवलशाही विरुद्ध लढ्यात असेल तर वाटेल त्या मार्गाने वाटेल तितक्या वेळा आपण सांगत राहणे आणि ते ऐकत नसतील तर आपण तो लढा लढतच राहणे आवश्यक आहे, हाच तेवढा पर्याय आहे. आपण असे न करता ओबीसी बिनडोक, लाचार, जातीवादी, ब्राम्हणांचे पाय चाटणारे आहेत असे त्यांना टोमणे मारत राहिलो तर हे हिंदू मागास शूद्र अतिशूद्र वर्णाचे लोक तुमचे कधीच ऐकणार नाहीत. उलट त्यांचा अहंकार दुखावला जाईल आणि द्वेष भावनेने तुमचे विरोधात संघ भाजपचे कट्टर समर्थक होतील. आज तेच चित्र निर्माण झाले आहे. त्यात आपला सिंहाचा वाटा आहे असे म्हटले तर चूक वाटू नये.

**ते स्वतःला श्रेष्ठ समजतात :-** ब्राम्हणांनी अशी खुंटी गाडून टाकली की ती लवकर बाहेर काढून फेकल्या जात नाही. ती म्हणजे, ‘तुम्ही आमचे पेक्षा नीच आहात आणि आम्ही तुमचे पेक्षा उच्च आहोत. असे या लोकांना वाटते.’ ब्राम्हणा पेक्षा नीच असलो तरी तुमच्या पेक्षा उच्च असल्याचे समाधान आहे. ही भावना मोठी खुंटी आहे.

लेखांक १३२



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

**ब्राम्हण सत्तेत आहेत :-** ज्यांचे जवळ सत्ता असते ते तुकडे टाकतात. या जातीतील श्रीमंत आणि प्रतिष्ठित लोकांना सत्तेत सहभागी करून सन्मान देतात. त्यामुळे तो त्याग करणे आणि लढा देणे हे त्यांना अवघड वाटते. विळा विकून खीळा घेण्यासारखा व्यवहार वाटतो.

ब्राम्हण त्यांना एकाएक जिवंत मारत नाही तर मांजर जशी उंदिराला खेळवत खेळवत मारते तसे मारते.

एखादा बेडूक थंड पाण्याचे लोखंडी टबात टाकून त्याचे खाली मंद मंद दिवा ठेवला तर पाणी एकदम तापत नाही. ते इतके धिमे गतीने तापत जाते की बेडूक ते तापमान सहन करू शकते. त्यामुळे ते त्यातून बाहेर पाडण्यासाठी प्रयत्न करीत नाही. त्याला तशी गरज वाटत नाही. पण एक वेळ पाणी उकळायला लागते. बेडकाला आता त्रास होतो. तो बाहेर पडण्यासाठी उडी मारण्याचा प्रयत्न करतो. पण आता त्याचेत त्राण उरलेला नाही. त्यामुळे काही वेळाने तो मरतो. ओबीसी बद्दल ब्राम्हणांनी हीच निती वापरली. त्यामुळे आदिवासी, ओबीसी आणि अतिशूद्र हिंदू दलीत असेच अधोगतिस जात आहेत.

**तुम्ही सत्ताधारी व्हा म्हणजे ते तुमचे ऐकतील :-** बौद्ध लोक जेव्हा सत्ताधारी होतील तेव्हा ओबीसी आदिवासी आणि हिंदू दलीत लोक ब्राम्हणांचा पदर सोडून तुमचेकडे येतील. त्यांना सत्तेची चव माहिती आहे. ते सत्तेशिवाय राहू शकत नाही. त्यासाठी ते काहीही करतात. आईचे दूध विकू शकतात. म्हणून केवळ प्रबोधन करून भागत नाही तर सत्ताधारी होणे आवश्यक आहे.

**सत्ताधारी होऊ शकतो :-** महाराष्ट्रात आपले पासंगाचे संख्याबळ आहे. आपण म्हणू त्याला निवडून आणू शकतो आणि म्हणू त्याला पराभूत करू शकतो. केवळ आपण आपले विभाजन टाळून एकसंघ झालो पाहिजे. एक विचार एक पक्ष, एक नेता एक झेंडा, एक नारा एक कृती करणे आवश्यक आहे. आपल्याला काहीच गमावण्यासारखे नाही. नेतृत्व वैचारिक हवे. शत्रू निश्चित करावा. एक संघ व्हावे. जो बाहेर पडेल, गद्दारी करेल त्याला कायमचा धडा शिकवावा. आपण सत्तेचे वाटेकरी होऊ. आपल्या मतावर आदिवासी, ओबीसी, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, मांग, चांभार, भंगी, खाटीक यांना निवडून आणा. त्यांना वैचारिक बनवा. उकिरड्यातून उचलून विधान सभेत किंवा लोकसभेत बसवा पण तो वैचारिक असावा. सत्ता हाती येईल. मुसलमान, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, कम्युनिस्ट दुःखी आहेत ते तुमचे जवळचे आहेत. मित्र नसतील तरी शत्रू तर नक्कीच नाही. ही मुत्सद्दिगिरी अंगी बाणली आणि त्याग करायची तायारी ठेवली तर परिवर्तन होईल अशक्य काहीच नाही. केवळ बौद्ध समाजातच ती ताकद आहे. 500 महार 25000 पेशव्यांना पराभूत करतात. कारण विद्रोहाची आग मनात पेटली होती. आजही तीच आग पेटली आहे. पण विभाजित आहोत. काहीच होऊन राहिले नाही.

**आज मोठी संधी आहे :-** सारे नेते मेले आहेत. महाराष्ट्रात ज्येष्ठ नेते केवळ बाळासाहेब प्रकाश आंबेडकर आहेत. त्यांनी केवळ वैचारिक व्हावे. आपल्या आई वडिलांच्या विवाहाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विरोध केला होता, आम्हाला काही मिळाले नाही, आमचेसाठी त्यांनी काहीच केले नाही हे विसरून जावे. द्वेष विसरून जावा. कट्टर वैचारिक व्हावे आणि लढाईचे नेतृत्व करावे सत्ता पायाशी लोळण घेईल. संघाची प्रतिक्रांती आपण रोखू शकू. आज आपला शत्रू ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही आहे. भाजप आणि काँग्रेस हे दोन्ही शत्रूच आहेत. परंतु एकावेळी दोन शत्रू सोबत लढता येत नाही. तो मुत्सद्दीपणा नाही. शत्रूचा शत्रू हा मित्र या न्यायाने विचार करावा लागेल. भाजप हा बलाढ्य, आक्रमक, लोकशाही विरोधी, संविधान विरोधी, धर्मांध, कट्टर जातीयवादी, आतंकवादी सत्तेत आहे आणि हे अवगुण त्यांनी मान्य केले आहे. ते सिद्ध झाले आहे. त्याचा पराभव कोणताही एक पक्ष, एक जात, एक धर्म करू शकत नाही. म्हणून भाजप विरुद्ध सर्व अशी लढाई झाली तरच तो पराभूत होतो. त्याचा पराभव आज शक्य आहे उद्या नाही. लोकशाही संपल्यावर काहीही मार्ग राहणार नाहीत. म्हणून आज सावध होणे आवश्यक आहे. असे झाले तर ओबीसी आदिवासी आणि हिंदू दलीत आपल्या सोबत नाही तर आपण सर्व सोबत सोबत राहून सामाजिक क्रांति घडून आणू. परंतु हे न करता केवळ टोमणे मारत राहू तर आपली कबर खोदण्याचे काम आपणच केल्यासारखे होईल. ■ ■

“ नेहमी तत्पर रहा; बेसावध आयुष्य जगू नका... ”



# धम्ममय कलातपस्वी

**‘शोध तथागत बुद्धांच्या पदचिन्हांचा’ या माहितीपटाचे उद्गाते, ‘बुद्धांचा अहिंसा, करुणा आणि शांततेचा विचार जगभर पसरावा आणि आजच्या तरुण पिढीने बुद्धांनी दाखवलेला मार्ग अनुसरावा’ असा आग्रह धरणारे प्रसिद्ध छायाचित्रकार, चित्रपट निर्माते स्मृतिशेष विजय मुडशिंगीकर यांच्या चिरंतन स्मृतीनिमित्त...**



महाराष्ट्राचे प्रसिद्ध छायाचित्रकार म्हणून नावारूपास आलेल्या विजय मुडशिंगीकर यांचा जन्म 15 ऑगस्ट 1960 रोजी कोल्हापुरात झाला असला तरी खऱ्या अर्थाने त्यांची कर्मभूमी मुंबई महानगरी होती. छायाचित्रकार या नात्याने मुडशिंगीकरांनी ‘गंगा आणि गंगेतील प्रदूषण’ या विषयावर संशोधनाकरिता गंगेच्या खोऱ्यातून सहा वर्षे वणवण भटकंती केली. त्यातून त्यांची पावले हळुवारपणे बुद्धांच्या शोधात निघाली. लुंबिनी या बुद्धांच्या जन्मस्थानापासून सुरू झालेला त्यांचा धम्मप्रवास नालंदा, राजगीर, बोधगया (बिहार), श्रावस्ती, कुशीनगर, सारनाथ (उत्तर प्रदेश), सांची (मध्य प्रदेश), वैशाली (बिहार), लडाख (जम्मू आणि काश्मीर), संकिसा (उत्तर प्रदेश), अजंता लेणी (महाराष्ट्र), अनुराधापूर (कोलंबो, श्रीलंका) या ठिकाणापर्यंत झाला.

बुद्धांच्या विचारांची तरुण पिढीला नव्याने ओळख करून देण्याकरिता ‘डिस्कव्हरी ऑफ तथागत बुद्धाज ुटप्रिंट’ या नव्वद मिनिटांच्या चित्रिफतीचे मुडशिंगीकरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 125व्या जयंतीदिनी लोकार्पण केले. या महान कार्यासाठी त्यांनी आपले राहते घर आणि पत्नीचे दागिने मुंबई बँकेत गहाण ठेवून सुमारे 35 लाख रुपयाचा निधा उभा केला आणि हाती घेतलेले कार्य मोठ्या जिद्दीने आणि अविश्रांत परिश्रम करून पूर्ण केले. शोध तथागत बुद्धांच्या पदचिन्हांचा या माहितीपटाची निर्मिती करून सर्वसामान्य लोकांमध्ये बुद्ध विचारांबद्दल प्रबोधन करण्याचा त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला. त्याच चित्रिफतीवरून दोनशे पानाचे आणि दोनशे एकावण्ण बुद्धांच्या मनमोहक चित्रांचे ‘कॉफी टेबल बुक’ 2017 साली प्रकाशित केले. त्यांचे कॉफी टेबल बुक म्हणजे एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतल्यावर एक सामान्य माणूस किती असामान्य कार्य पूर्ण करू शकतो याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणावे लागेल.

कॉफी टेबल बुक, ज्याला ‘कॉकटेल टेबल बुक’ म्हणून देखील ओळखले जाते. हे एक मोठ्या आकाराचे, सामान्यतः हार्ड-कव्हर केलेले पुस्तक असते ज्याचा उद्देश एखाद्या टेबलवर प्रदर्शित करून पाहुण्यांचे मनोरंजन केले जाते. आज भारतच नव्हे, जगामध्ये युद्धखोरी आणि अशांतता सर्वत्र पसरली आहे. अनेक देशांमध्ये अराजकतेचे वातावरण आहे. अशा अशांततेच्या वातावरणात असलेल्या देशात कधी काळी गौतम बुद्धांसारख्या अहिंसा, शांतता आणि समतेचा विचार घेऊन पदभ्रमण करणारा महामानव जन्माला आला होता हेच आपण विसरलो आहोत. हाच संदेश मुडशिंगीकरांच्या ‘डिस्कव्हरी ऑफ तथागत बुद्धाज फुटप्रिंट’ या कॉफी टेबल बुकवरून मिळतो.

मुडशिंगीकार पाठीच्या कण्याच्या दुखण्याने त्रस्त होऊन रुग्णालयात दाखल झाले होते. सगळीच हालचाल बंद झाली असताना आपण वाचू शकतो हे लक्षात आल्यावर वाचनाचा छंद त्यांनी तिथेही जोपासला. त्यांच्या वाचनात गंगा नदीचे प्रदूषण आले. ‘या दुखण्यातून बरा झालो तर गंगा नदीचे प्रदूषण दूर करण्यासाठी काम करेन’ असा संकल्प त्यांनी केला होता. जगप्रसिद्ध निरोसर्जन डॉ. प्रेमानंद रामाणी यांनी शस्त्रक्रिया केल्यावर ते पुन्हा आपल्या पायावर उभे राहिले. गोमुख ते गंगासागर ही 2250 किलोमीटरची गंगा परिक्रमा सहा वर्ष वारंवार केली. हा त्यांचा जीवनप्रवास विस्मयचकित करणारा आहे. सहा वर्षे कॅमेरा हाती धरून त्यांनी गंगा नदीचे मनोहारीरूपाबरोबरच विदृप रूप चित्रीत करून प्रदर्शनाच्या माध्यमातून देशासमोर मांडले. त्या प्रवासाची चित्तथरारक कथा सांगणारे त्यांचे ‘पंचगंगा ते गंगा’ हे पुस्तक पर्यटनप्रेमींसाठी पर्वणीच आहे.



**मिलिंद मानकर**
**मो. 8177866397**

त्यांच्या छायाचित्रांचे एकल प्रदर्शन ललितकला अकादमी, नवी दिल्ली (ऑगस्ट 2006), पिरामल आर्ट गॅलरी, मुंबई (जानेवारी 2007), पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई (एप्रिल 2007), प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, मुंबई (एप्रिल-मे 2007), आर्ट गॅलरी याज्ञवल्क्य फाउंडेशन, कल्याण, (मे 2007), एव्हरेस्ट हॉल, डोंबिवली कल्याण (जून 2007), ग्रँट मेडिकल कोलाज, मुंबई (सप्टेंबर 2007), नगीनदास खंडेलवाल कॉलेज, मालाड मुंबई (जानेवारी 2008), रचना संसद, मुंबई (मार्च 2009), गंगा नदीच्या काठी लोकांसाठी जनजागृती मोहीम. गंगोत्री - गंगेचे उगमस्थान ते खाडीजवळील गंगासागर. बंगालचा ‘जन जोडो गंगा यात्रा’ या जनजागृती मोहिमेचे आयोजन 3 मार्च ते 18 मार्च 2010 या कालावधीत करण्यात आले.

विजय मुडशिंगीकरांनी आपल्या आयुष्यात अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हे मिळविली. त्यात डिव्हाईन एमएफजी प्रा. लि. द्वारा आयोजित वर्ष 1999 मध्ये फोटोअर 99 कॅन्डिड फोट कॉन्टेस्ट’मध्ये सांत्वन पारितोषिक विजेता मुंबई, 2002 मध्ये ‘अविटोको फाउंडेशनर्ते राष्ट्रीय छायाचित्रण स्पर्धेत प्रयास पुरस्कार देऊन सन्मानित, मुंबई. बेटर फोटोग्राफी मॅगझिनने जून 2004 मध्ये आयोजित केलेल्या ‘कोनिका मिनोल्टा ट्रॅव्हल फोटोग्राफी कॉन्टेस्ट’मधील ट्रॅव्हल फोटोग्राफर ऑफ द इयर - 2004 द्वितीय पारितोषिक विजेता. भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने आयोजित केलेल्या 14व्या (2002) आणि 18व्या (2006) राष्ट्रीय छायाचित्र स्पर्धेमध्ये प्रदर्शनासाठी निवडलेले छायाचित्र. 2009 मध्ये पर्यावरण जागृतीवर आधारित ‘गंगाजल’ छायाचित्र प्रदर्शन आयोजित केल्याबद्दल फोटो सर्कल सोसायटी, ठाणे तर्फे सत्कार. रोटरी ग्रीन अर्थ समिट 2009 मध्ये रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट 3140 द्वारे सत्कार, 2009 मध्ये ‘आमच्या माता गंगेच्या संरक्षणात पर्यावरणीय समस्यांसाठी अनुकरणीय योगदान’ यासाठी ग्लोबल वार्मिंग आणि जल व्यवस्थापनावरील राष्ट्रीय परिषद प्रमुख आहेत.

मुडशिंगीकर उत्कृष्ट छायाचित्रकारासोबतच धम्मप्रेमी आणि चित्रपट निर्मातेही होते. त्यांनी निर्मित केलेला आणि अभिनेता उमेश कामत याची मुख्य भूमिका असलेला ‘ताठ कणा’ हा चित्रपट अनेक अडचणींचा सामना केल्यानंतर देश-विदेशातील फिल्म फेस्टिव्हलमध्ये गाजला होता. मात्र मोठ्या पडद्यावर प्रदर्शन होण्यापूर्वीच त्यांची 9 सप्टेंबर 2024 रोजी वयाच्या 64व्या वर्षी प्राणज्योत मालवली. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी बुद्धधम्माच्या प्रचार आणि प्रसारावर भर दिला.

‘आजच्या तरुण पिढीने बुद्धांनी दाखवलेला मार्ग अनुसरावा’ असा आग्रह धरला. ते आज आपल्यासोबत नसले तरी त्यांची अजोड, सर्वांगसुंदर कलाकृती ‘डिस्कव्हरी ऑफ तथागत बुद्धाज फूटप्रिंट’ हा टेबल बुक बुद्धजनांना सदैव प्रेरणा देत राहील. आपल्या सुंदर कलात्मक छायाचित्रातून बुद्धांचा प्रेम, दया, करुणा आणि मानवतेचा ओजस्वी संदेश जगभर पोहोचविणाऱ्या विजय मुडशिंगीकर या श्रेष्ठ कलावंताच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन करतो. ■ ■

# छोटा बारूद गोटा, धमाका मोठा

**सकाळी वाचकांच्या हाती वृत्तपत्र पोहोचावे, यासाठी वितरक एजंट आणि घराघरांत जाऊन वृत्तपत्र देणारे वितरक यांची धडपड सुरु असते. ही सगळी हालचाल तीन ते चार तास चालते. हिशोब घेणेदेणेही यामध्येच येते. इतर वृत्तपत्रांच्या बरोबरीने दैनिक बहुजन सौरभची टीमही कार्यरत आहे. बहुजन सौरभला हलक्यात घेऊ नका! हे वृत्तपत्र छोटा बारूद गोटा, पण धमाका मोठा आहे! हे शब्द होते वितरक एजंटचे. या बोलण्यातून हे लक्षात येते की अनेकांचा वाचन-व्यवहार दांडगा आहे; म्हणजेच, बहुजन सौरभ जे प्रकाशित करत आहे ते वाचकांना आवश्यक वाटते. कोणाच्याही दृष्टीने बहुजन सौरभला हलक्यात घेऊ नये, यामागे ठोस कारणे आहेत.**

दिवाळीच्या काळात सर्व वृत्तपत्रांचे विशेषांक प्रकाशित होतात. त्याचप्रमाणे अनेक वृत्तपत्रे आपल्या सहकारी वितरकांना व कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देतात. अशीच अपेक्षा वितरकांनी बहुजन सौरभकडूनही केली होती. परंतू आमची काही ध्येय आणि धोरणे आहेत. त्यानुसार, दैनिक बहुजन सौरभने 1 ऑक्टोबर ते 16 ऑक्टोबर 2025 या दरम्यान धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त धम्म महोत्सव साजरा केला. या काळात विविध ठिकाणी धम्मचक्र विशेषांक प्रकाशित करून वाचकांशी जोडले गेले. तसेच कर्मचाऱ्यांना आणि वितरकांना बोनस, मानधन व भेटवस्तू देऊन मैत्रीभाव जपला. सकाळच्या निळ्या पहाटे नागपूरच्या मुख्य वितरक एजंट्ससोबत भेटी झाल्या. त्यावेळी एजंट आणि वितरकांनी काही संवादात्मक प्रतिक्रिया दिल्या, त्या येथे शेअर करत आहे. दैनिक बहुजन सौरभने नागपूर शहरात जसे आपले पाय रोवले आहेत, तसे स्वतःचा वेगळा ठसा निर्माण केला आहे. इतर वृत्तपत्रांनीही बहुजन सौरभची दखल घेतली आहे. ज्ञानप्रबोधिनी म्हणून आगळीवेगळी जबाबदारी स्वीकारली आहे आणि एक नवी दिशा दिली आहे. वाचकांच्या मनातही या वृत्तपत्राने आपले स्थान निर्माण केले आहे. विशेष म्हणजे, बहुजन सौरभचे बहुतेक वाचक हे ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यांच्या पाठिंब्यावरच हे दैनिक उभे आहे. कारण हेच वयस्कर वाचक अनेक साप्ताहिके आणि वृत्तपत्रे प्रकाशित करण्याच्या कार्यात सहभागी राहिलेले आहेत. त्यांना वृत्तपत्र प्रकाशनातील कष्ट आणि जबाबदऱ्या नीट माहिती आहेत. फुले आणि आंबेडकर यांच्या काळातील वृत्तपत्रांचे वाचक म्हणून ‘दैनिक’ असले पाहिजे, ही जाणीव त्यांना आहे. म्हणूनच ते या दैनिकासाठी आग्रही आहेत.

बहुजन सौरभचा प्रवास केवळ आंबेडकरी समाजाच्या जाहिरातींच्या आणि दानपारमितेच्या बळावर सुरू आहे. समर्पित साथीदारांच्या मदतीने या वृत्तपत्राने उत्तुंग झेप घेतली आहे. आम्ही लोकांनाही प्रोत्साहित करतो की हे वृत्तपत्र घ्या, वाढवा आणि टिकवा. गेल्या पाच वर्षांत वाचकांनी प्रचार-प्रसारातून बहुजन सौरभचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला आहे. लोक म्हणतात, ‘हे वर्तमानपत्र घरोघरी गेले पाहिजे. पाच रुपयांनी विकत घेतले पाहिजे.’ वाचकांना वाटते की नागपूर शहरात बहुजन सौरभ हे इतर वृत्तपत्रांना टक्कर देणारे सक्षम दैनिक आहे.

बहुजन सौरभला आर्थिक मदत आणि सहयोग आवश्यक आहे. वाचक आणि संचालक मंडळ या दोघांचा सामूहिक प्रयत्न त्यासाठी सुरू आहे. 1 ते 16 ऑक्टोबरदरम्यान धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. धम्मचक्र प्रवर्तन दिन विशेषांक ‘परिवर्तन 2025’ हा त्याच दिवशी वाचकांना अर्पण केला गेला. अल्पावधीत अधिक माहिती वाचकांपर्यंत पोचविण्याचे काम सातत्याने करण्यात आले. वाचकांनी जाहिराती दिल्या, लेखकांनी साहित्य आणि आर्थिक मदत केली. मित्रांनी कविता पाठवून अंकाला काव्यात्मक साज चढवला. त्यांच्या सर्वांच्या सहकार्याबद्दल आम्ही अत्यंत कृतज्ञ आहोत. आमच्या हितचिंतक वाचकांचा या वृत्तपत्राच्या वाढीतील सिंहाचा वाटा आहे.



**विलास गजभिये**
**मो. 9421588901**

एक मजेदार प्रसंग सांगायचा तर, एक वरिष्ठ मित्र म्हणाले, ‘माझ्या शेजाऱ्यांनी बहुजन सौरभ सुरू केला, पण ते पुण्याला गेल्याने त्यांनी पेपर बंद केला.’ दुसरे मित्र लगेच म्हणाले, ‘अरे, फक्त पाच रुपयांची गोष्ट आहे! आपण पाच रुपयांनी पेपर विकत घेतला तर त्याला आर्थिक मदत होईल आणि प्रसारही वाढेल.’ जर प्रत्येक वाचकाने हा भाव मनात ठेवला, तर बहुजन सौरभचा खप नक्की वाढेल.

हे वर्तमानपत्र जाहिरातींपेक्षा लोकांच्या हातात असणे महत्त्वाचे आहे. बहुजन सौरभ तुमच्या टेबलवर ठेवा; घरात येणारे-जाणारे किमान त्याच्या हेडलाईन तरी वाचतील, विचारांचा प्रसार होईल. तुम्ही पेपर घेत नसल्यामुळे त्याचा प्रसार थांबतो. ज्या क्षणी तुम्ही नियमित दैनिक घ्यायला सुरुवात कराल, त्या दिवसापासून बहुजन सौरभ झपाट्याने वाढेल आणि तुम्ही अभिमानाने म्हणाल, ‘दैनिक बहुजन सौरभ आमचे वृत्तपत्र आहे.’

आपण सर्वांनी हे वृत्तपत्र टिकवावे आणि वाढवावे. चार पानांचा पेपर असला तरी तो घरात सहजपणे दुर्लक्षित राहत नाही; उलट इतर पेपरमध्ये तो उठून दिसतो. वितरण व्यवस्थेतले बहुतांश कर्मचारी बहुजन समाजातील आहेत आणि त्यांचे वाचन उत्कृष्ट आहे. त्यांचा अभिप्राय, ‘छोटा बारूद गोटा, धमाका मोठा!’ माणुसकीच्या हक्कासाठी बहुजन सौरभ पाहिजे, आमच्या कार्याला नवचैतन्य देतो.

दैनिक बहुजन सौरभ कोणत्याही राजकीय पक्षाचे मुखपत्र नाही; ते आंबेडकरी विचारसरणीचे वृत्तपत्र आहे. समाजातील उपेक्षितांच्या हक्कांसाठी आणि माणुसकीसाठी विविध विषयांवर सतत लेखन केले गेले आहे. आपल्या विचारांच्या लेखकांविषयी भेदभाव केला नाही. नव्या लेखकांना संधी देण्यात आली. प्रिंट मीडियासह यूट्यूब आणि इतर माध्यमांतून लेखकांना बळ देण्यात आले. बहुजन सौरभने स्वतंत्र बाणा निर्माण केला आहे. नव्या लेखनाला प्रोत्साहन देणे हे आपले कर्तव्य मानले आहे.

जसे कौटुंबिक वारसामध्ये संपत्ती आपल्या मुलांकडे जाते, तसेच आपल्या आंदोलनाचा वारसा चळवळीतील नव्या पिढीकडे जावा, हा बहुजन सौरभचा दृष्टिकोन आहे. ज्यांनी ‘छोटा बारूद गोटा, धमाका मोठा’ म्हटले, त्यांनीही हाच विचार मांडला. तुम्हीही दैनिक बहुजन सौरभची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतलीत तर ही चळवळ नक्कीच पुढे नेली जाईल, हा आमचा ठाम विश्वास आहे. ■ ■

## काव्यफुले



संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225

### मातीमोल

तोंडावर आलेला घास
निसर्गाने हिरावून नेला
शेतात दिसते पाणीच, पाणी
असा, कसा हा निसर्ग कोपला

ज्याचे जळते त्यालाच कळते
बघणारे जमून गंमत बघतात
त्यांना देणे, घेणे नसते कोणाशी
वेतनावर, वेतन मागतात

बळीराजा जगाचा पोशिंदा
म्हणण्यात तो राहिला आहे
शासनानेही पाठ फिरवली
सर्वांचे एकमत दिसत आहे

बळीराजाचे पीक मातीमोल झाले
बघून कोणाला दया येत नाही
एवढी माणुसकी संपली का हो..?
बळीराजासाठी कोणी वेळ काढत नाही।

**संगीता संतोष ठलाल**
**मु.कुरखेडा जि.गडचिरोली**
**7821816485**

### मिरचीचा ठेचा...

बायकोनं माह्या बनवला,
ठेचा हिरव्या मिरचीचा
मले म्हणते चवीपुरता,
घ्या ना जरासा
ठेचा लागला मले गोड,
आणखीन म्या मागला
म्या बी मंग मनसोक्त,
ताव ठेच्यावर मारला
दोन भाकरी आणखीनच,
दाबून म्या खाल्ल्या
मले आता ठेचाने,
कमाल आपला दावला
दिवसभर पोट माह्य,
ठास-ठूस करत होते
हवामानाचा अंदाज आता,
पोट माह्य सांगत होतं
रातच्याले पोट माह्य,
गुड-गुड करत होतं
बायको झोपीत मले म्हणे,
आभाळ काहून गडगडत होतं
माही हालत मले माहित,
माह्य कुठं झोंबत होतं
चकरा मारून रातभर,
पोटात काही राह्यलं नोतं
आता काय सांगू माही,
चांगलीच धूवून निंगली होती
ठेचा खायची हावूस माही,
पूरीच आता भागली होती

**चंद्रकांत सावळकर**
**शेषनगर, नागपूर**
**फोन नं. 9922368852**

### पाऊस

असा पाऊस यावा ...
मनाचा मळ धुवून जावा
माझं तुझं विसरून सारा समाज एक व्हावा.. 1..
रानातून फुलाचा गंध यावा तसा,
सद्गुणाचा विकास व्हावा
असा पाऊस यावा .....
नितीमत्तेचा सुगंध दरवळावा..2..
रान डोंगर टवटवीत झाला
पावसाने हिरवा गालिचा पसरविला
यावरून चालताना, ‘माणुसकीचा गंध’ यावा
असा पाऊस यावा’
दुफळीचा मळ धुवून जावा..3..
वारे एकीचे वाहावे
असमानतेच्या विरुद्ध समाज एक व्हावा.
असा पाऊस यावा ...
अंतरिचा मळ धूवून जावा... 4....

**इंजि. शुद्धोधन बडवणे**
**(नि) कार्यकारी अभियंता, नागपूर**

### मिस यू आई

दिवाळीला सजली दीपज्योत
पंचमीस आभाळ दाटून आले
चेतनेचा दीपक हृदयात तेवतो
नकळत मनही खूप भरून गेले!!

अस्त पाहिला याच डोळ्यांनी
भावना गहिवरल्या हुंदक्यांनी
का अवस्था व्हावी केविलवाणी
का जखमा साठवाव्या हृदयानी!!

अलवार संध्यासमयी गहिवरले
स्वर गुंजते आताही कानी मनी
कसे विसरणार आई तुज कुणी
निरोप दिला जड अंतःकरणानी !!

उन्हाचे प्रखर चटके सोसूनही
होती झाड तू सावली देणारी
धगधगणाऱ्या त्या प्रकाशातही
होती तू मंद मंद समई तेवनारी!!

प्राणापलीकडे आंधळ्या मायेत
होती आयुष्यभर गुरफटलेली
कलियुगातील स्वार्थी जगात
अंतापर्यंत प्रेमात होरपळली!!

**प्रणोती हरीश कळमकर**
**गुरुदेव नगर, नंदनवन नागपूर**
**9834209457**

### विद्यार्थी दिवस...??

बालवायतच संघर्षाला झाली होती सुरुवात
ज्ञान देण्यासाठी बघितली जात होती जात
महार हिनवून वर्गाबाहेर अभ्यास केला सुरु
शिकवणार काय सांगा असल्या छोट्या बुद्धिचे गुरु...1
गरीबी तुच्छता अपमान झाले रोजचे सोबती
शिकायचे ठरवले जिंकल्या अडचणी अनेकती
अंधार फोडून ज्ञानदीप तेविले अखंड सुरु
शिकवणार काय सांगा असल्या छोटया बुद्धिचे गुरु...2
स्वकर्तव्य, जिद्दीने अफाट बुद्धीमत्ता मिळवली
आजन्म विद्यार्थी अहोरात्र खुर्चीत खिळवली
वाघिणीचे बाबा दूध पिऊन आता पुरून उरू
शिकवणार काय सांगा असल्या छोटया बुद्धिचे गुरु...3
विचारांनी समाज उजळला संस्कारित झरा
मानवतेचा संदेश दिला मोडी अन्यायाचा खरा
संविधानाने घडवला भारत जगी मार्गदर्शक ठरू
शिकवणार काय सांगा असल्या छोटया बुद्धिचे गुरु...4
विद्धार्थी दिवस तुमच्याचमुळे करतात आज सारे
ज्ञानसागरातून वेचत राहिले अखेरपर्यंत हिरे
चमकतोय देश सारा कोटी कोटी प्रणाम करू
शिकवणार काय सांगा असल्या छोटया बुद्धिचे गुरु...5

**मीनाक्षी दमयंती, नागपूर.**
**8275952542**

## ॥ प्रासंगिक ॥

# महात्मा फुले आणि बळीराजा

**बळी राजाची कथा सर्वांना ठाऊक आहे. कारण बालपणापासून आपण ती ऐकत आलो आहेत. तथापि वाढत्या वयाप्रमाणे या कथेविषयीचे, आपले आकलन मात्र वाढले नाही, असेच खेदाने म्हणावे लागते. वर्षानुवर्ष तीच कथा आपण सांगत आलो किंवा ऐकत आलो. त्यात काडीचाही बदल नाही. एवढी वैचारिक स्थितीप्रियता, आमच्या अंगी आली आहे. विचारच करायचा नाही असा प्रण केल्यावर, वय वाढले तरी बुद्धीत वाढ कशी होणार! परिणामी हजारवेळा ऐकूनही त्या कथेतल्या विसंगती, आपल्याला कळल्या नाहीत.**

असो! आपण डोळ्यावर कातडे ओढले, म्हणून सगळ्या जगाने डोळ्यावर कातडे ओढले, असे होत नाही. जगात काही शहाणी माणसेसुद्धा असतात. ते प्रत्येक गोष्टीचा बारकाईने विचार करतात. त्यामुळे त्यांना सत्याचा साक्षात्कार होतो. महात्मा जोतिबा फुले हे असेच सत्यशोधक सुधारक. सत्यशोधकीय दृष्टिमुळे बळीराजाच्या कथेतल्या विसंगती त्यांच्या सहज लक्षात आल्या.

बळी राजा अतिशय दानशूर होता. तो मातल्यामुळे त्याला मारण्यासाठी विष्णूने वामनाचा अवतार घेतला. वामनाने बळी राजाकडे तीन पावले जमीन दान





मागितली. बळी राजा त्यास तयार झाला. तितक्यात वामनाने अक्राळ विक्राळ रूप धारण केले. एक पाय पृथ्वीवर, दुसरा स्वर्गावर ठेऊन तिसरा पाय कोठे ठेवू असे त्याने बळी राजाला विचारले. बळी राजाने तो आपल्या डोक्यावर ठेवण्यास सांगितला. वामनाने बळी राजाच्या डोक्यावर पाय ठेवून त्याला पाताळात गाडला. अशी बळी राजाची कथा. ही कथा वाचल्यावर काही प्रश्नांचे मनात काहूर दाटते.

एक - बळीराजा दानशूर होता की मातलेला?

दोन - तो मातलेला असता, तर त्याने वामनाला दान दिले असते का?

तीन - तिसरा पाय स्वतःच्या डोक्यावर ठेवायला सांगणारा माणूस, मातलेला कसा असेल?

चार - बळी राजा जर दानशूर होता, तर मग त्याच्याकडे दान मागण्यासाठी विष्णूने, छद्मरुप का धारण केले?

पाच - बळी राजाने दानास नकार दिला नव्हता, तरीही त्याला पाताळात का गाडले? हा वामनाचा कृतघ्नपणा नाही का?

सहा - बळी राजा जर दुष्ट होता, तर मग बहुजन माता, भगिनी वर्षानुवर्षे, ‘इडा पीडा टळो, बळीचं राज्य येवो’ अशी प्रार्थना का करत आल्या?

या सर्व प्रश्नांनी महात्मा फुले अस्वस्थ झाले. विचारांती त्यांच्या ध्यानात आले की, बळी राजा आणि वामन, हा समतावादी व उत्पादक अब्राम्हणी संस्कृती आणि विषमतावादी, अनुत्पादक व वर्णवर्चस्ववादी ब्राम्हणी संस्कृती, यातील सांस्कृतिक वर्चस्वासाठीचा संघर्ष आहे. अशारितीने बळी-वामनाच्या मिथकाचा त्यांना उलगडा झाला. त्यातून प्राचीन भारताच्या इतिहास संशोधनाला नवा दृष्टिकोन, नवी दिशा मिळाली व भारतीय इतिहासाच्या पुनर्मांडणीला सुरवात झाली. आमच्या माता-भगिनींनी पिढ्यानपिढ्या ‘इडा पीडा टळो, बळीचं राज्य येवो!’ या आपल्या हृदयात जपून ठेवलेल्या प्रेमाच्या एका रेशीम धाग्याच्या सहाय्याने, महात्मा फुलेंनी ‘पाताळ’ गाठून पाताळात गाडलेला संविभागी सिंधु सम्राट बळी राजा आणि त्याचा खरा इतिहास जनतेपुढे आणला व ‘सुतावरुन स्वर्ग गाठणाऱ्या’ मनुवादी इतिहासाच्या पायालाच सुरुंग लावला. त्याची परिणती बळी राजा हा भारतीय कृषि संस्कृति व समतेचे सर्वोच्च प्रतीक आणि अभिमानबिंदू झाला. बळी राज्याची संकल्पना सर्वमान्य झाली. बलीप्रतिपदेला ‘बळी राजा गौरव दिन’ हा नवा आयाम मिळाला तर ‘बळीराज्य’ हे आपले सर्वोच्च ध्येय बनले आणि - ‘इडा पीडा टळो! बळीचं राज्य येवो!’ हा बळीराज्याच्या स्वप्नपूर्तिचा महामंत्र बनला. या स्वप्नपूर्तीसाठी बलीप्रतिपदेला सर्वत्र बळी राजा गौरव मिरवणुका निघत आहेत. याचं सर्व श्रेय महात्मा फुलेंना! महात्मा फुले आणि आपल्या कृषिसंस्कृतीचा सिंधुसम्राट बळीराजा या दोन्ही महानायकांच्या पवित्र स्मृतिंना सादर अभिवादन!■ ■

**सुभाषचंद्र सोनार**
**राजगुरुनगर.**

# थोरल्या घराण्याचा थोरला बा!

**वंश, वारस आणि घराणे हे शब्द लोक अभिमानाने व गर्वाने चारचौघांत वापरतात. ‘हा माझ्या वंशातील आहे’, ‘तो माझा वारस आहे’, ‘त्यांचे-आमचे घराणे एकच आहे’ अशा प्रकारच्या चर्चा जेव्हा केल्या जातात, तेव्हा त्यात आपुलकी आणि आपलेपणा असतो. यामध्ये नातेसंबंध दृढ होतात किंवा ते दिसतात. सुख-दुःखाच्या प्रसंगीही हे नातेसंबंध प्रकट होतात. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ही नाती, ही बीजे रोवली जातात आणि कायम टिकतात.**

नवीन नातेसंबंध जोडताना तर हे सगळे आवर्जून पाहिले जाते, कारण त्यातूनच आपले कुळ आणि मूळ शोधण्याचा प्रयत्न असतो. या विषयाला समाजमान्यता आहे. काही लोक आयुष्यभर आपला वंश, वारस आणि घराणे याबाबत कट्टर व एकनिष्ठ राहून आपली कर्तव्ये जपतात, तर काही जण एकमेकांचा फायदा घेऊन नंतर ओळख विसरतात, अशीही काही दुर्मिळ उदाहरणे आहेत. हे सगळे सांगण्याचे कारण म्हणज, ‘थोरल्या घराण्याचा थोरला बा’, त्याची कर्मकहाणी सांगण्यासाठी थोडे प्रास्ताविक केले. अशाच एका घराण्याचा थोरला बा म्हणजे त्या घराण्याचेच नव्हे, तर साऱ्या गावाचे नाक होता. त्याचा रुबाब आणि दरारा वर्णनातीत होता. शुभ्र पांढरे धोतर, त्यावर स्वच्छ शर्ट आणि झब्बा, त्यावर काळा कोट, पायात करकर वाजणाऱ्या कोल्हापुरी चप्पला आणि हातात उंचीला समतुल्य अशी घुंगरवाची काठी, असा त्याचा दरारा असायचा. बा सर्वांच्या सुख-दुःखात नेहमी पुढे असायचा. त्यासाठी त्याने कधीही आपल्या वेळेची किंमत केली नाही. सावलीसारखा तो सर्वांच्या पाठीशी उभा असायचा. कुणाचाही वादविवाद झाला तरी तो मिटविण्यासाठी लोक विश्वासाने बा ला बोलवायचे. त्या विश्वासाला त्याने कधी तडा दिला नाही. दोन्ही बाजू शांतपणे ऐकून, एखाद्या निष्णात वकिलासारखी उलटतपासणी करून पारदर्शक न्यायनिवाडा देत असे. कुणावर अन्याय होऊ नये याची खबरदारी घेत, ज्याने चुकी केली त्याला सुनावणी आणि ज्याच्यावर अन्याय झाला त्याला समाधानकारक न्याय देत असे. अंगठेबहादूर असूनही बा इतका हुशार कसा, असा प्रश्न अनेकांना पडायचा. तो कुटुंबातील सर्वात मोठा असल्यानेच कुटुंबप्रमुख होता. चार भावांनी मिळून कष्टाने कमवायचे, भावजयांनी घरात-शेतात राबायचे, पण सर्वांनी मालकी न मागता बा कडे दिली आणि त्यांचे विश्वासार्ह नाते टिकवले. न्यायनिवाडा आणि समाजसेवा याचे संस्कार त्याच्या रक्तात होते. म्हणूनच या गड्याने आयुष्यभर लग्न केले नाही. निष्कलंक, चरित्रसंपन्न जीवन त्याने जगले. भावजयांनी त्याला भावाची माया दिली आणि त्याने त्यांना बहिणीचे प्रेम दिले. वर्षानुवर्षं हे सगळे सुरळीत आणि आनंदात सुरू होते. कुणाकडूनही नाराजी किंवा तक्रार नव्हती. कुटुंबात व समाजात बा च्या शब्दाला वजन होते. पण हळूहळू ज्या कुटुंबाच्या एकतेवर तो अभिमान बाळगत होता, त्याच कुटुंबात मतभेदांची ठिणगी पडली. वाढते कुटुंब, छुप्या इच्छा-आकांक्षा-कदाचित याच कारणांमुळे फूट पडली. माणूस चालतो-फिरतो तोवरच त्याची किंमत असते, हे कटू सत्य बा च्या आयुष्यात उलगडले. बा थकलेला पाहून कुटुंबाने विभागणी केली. दोन वेळच्या जेवणापुरती त्याचीही वारानुसार वाटणी झाली. त्याच्या सल्ल्याकडे सर्वांनी दुर्लक्ष केले. समाजही असाच असतो, उगवत्याला नमस्कार करून मावळत्याला विसरतो. जीवनाच्या अखेरीस बा ने स्वतःचे विभक्त कुटुंब पाहिले. जमीन-जुमल्याची वाटणी झाली, छोट्या तुकड्यांवर खुश झाले, पण बा चे अंतःकरण वेदनेने भरले. तो मुक्या-बहिऱ्यासारखा झाला. भूतकाळाच्या आठवणीत तो आसवे गाळीत बसायचा. स्वाभिमानाने जगलेला बा अखेर तुकड्यापुरता लाचार झाला. बा ची घुसमट आणि वेदना वयानुसार वाढत गेली. अखेर एका दिवशी तो झोपेतच कायमचे डोळे मिटून गेला. मात्र त्याच्या मृत्यूने घरातील वाद सर्वांसमोर आले. प्रेताच्या खर्चावरूनच मतभेद झाले. सामूहिक वर्गणीसारखी हात आखडता घेऊन अंत्यसंस्कारासाठी पैसे दिले गेले. ज्यांना त्याने अंगाखांद्यावर खेळवले, फिरवले, ते वारस स्वार्थाने वागले. थोरल्या बा चे अंत्यसंस्कार झाले, पण गावभोजाचे काय? बहुतेकांनी साधेपणाचे कारण देत ‘बा च्या इच्छेनुसार साध्या घरगुती स्वरूपात विधी होतील’ असे जाहीर केले. आता ऐकायला कोण होते आणि मेलेल्या माणसाला विचारणार कोण? लोकांना प्रेताची विल्हेवाट महत्त्वाची होती. कुठल्याही सभा-समारंभात जोरदार भाषणे करणाऱ्या थोरल्या बा ची शोकसभा मात्र झालीच नाही. कुणाचे भविष्य किंवा शेवट कसा होईल, हे कुणी सांगू शकत नाही.

**थोरल्या बा ला भावपूर्ण श्रद्धांजली.■ ■**



**राष्ट्रपाल भा. सावंत**
**मो. 9403144356**



रमाईचे स्वप्न - २४४

## जेतवन बुद्ध विहार

जेतवन बुद्ध विहार, प्रजापती नगर, पूर्व नागपूर. विहार स्थापना 2006 मध्ये करण्यात आली. हे विहार स्थानिक लोकवर्गणीतून व शासकीय अनुदानातून तयार झाले आहे. या विहारात दररोज सायंकाळी वंदना होत असते. त्याचप्रमाणे महापुरुषांच्या जयंती आणि स्मृतिदिवस साजरे केले जातात. वर्षावासाच्या महिन्यात प्रवचने आयोजित केली जातात. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जेतवन बुद्ध विहार समितीचे सर्व सभासद उपासक आणि उपासिका यांचे नेहमी मोलाचे सहकार्य असते.

संवाद मित्र हरिदास बेलेकर, 9372421695

# धम्मक्रांतीनंतरचे बीज अंकुरविणारे पहिले भदन्त सदानंद



**नागपूर :** 1956 च्या ऐतिहासिक धम्मक्रांतीनंतर तिच्या बीजांना अंकुरित करण्याचे कार्य भदंत सदानंद यांनी निष्ठेने पार पाडले. धम्माची ओळख नसलेल्या जनसामान्यांना प्राथमिक धम्मशिक्षण देऊन त्यांनी खडकाळ भूमी सुपीक केली, असे मत भदंत नाग दिपंकर महास्थविर यांनी व्यक्त केले. भदंत सदानंद हे बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे धनी असून त्यांनी अनेक धार्मिक ग्रंथांचे लेखन व संपादन केले आहे. त्यांनी देश-विदेश प्रवास करून ऑल इंडिया भिक्खु संघाचे संघानुशासक म्हणून भिक्खु संघटनाला बळ दिले. उपासक-उपासिका संघटन आणि विहार निर्मिती चळवळीतही त्यांचे योगदान उल्लेखनीय राहिले आहे. त्यांच्या 86 व्या वाढदिवसानिमित्त राहुल बाल सदन, महेंद्र नगर येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमात त्यांच्या सहा दशकांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमास श्रीलंकेतील डॉ. बी. आर. आंबेडकर बुद्धिस्ट धम्मा स्कूलचे प्राचार्य भदंत उन्नपान आर्यधम्म महास्थविर, नुअरवेली येथील भदंत उडवल धम्मिदो महास्थविर, जपानचे युशी सिमदा, थायलंडचे निवासी भिक्खु महानाम व श्रामणेर विपस्सी उपस्थित होते. राहुल बाल सदनच्या केअरटेकर माई विमल आळे यांनी सांगितले की, 'भदंत सदानंद यांनी आम्हाला धम्माचे प्राथमिक शिक्षण दिले नसते, तर आज अनाथांची सेवा करता आली नसती आणि अनेक पुरस्कारही मिळाले नसते. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच भिक्खु आनंद कौसल्यायन, भिक्खु सावंगी मेधंकर, भिक्खु धर्मकिर्ती यांच्याशी संपर्क आला.' कार्यक्रमास केअरटेकर अंकलजी काशीनाथ मेश्राम, रवि मेश्राम, गुणप्रिया भोयर, बाली मेश्राम तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राहुल बाल सदन हे 1978 पासून बौद्ध प्रशिक्षण संस्थानमार्फत डॉ. भदंत आनंद कौसल्यायन आणि डॉ. सावंगी मेधंकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असून, समाजसेवा, शिक्षण आणि धम्मप्रसाराच्या क्षेत्रात सतत सेवा देत आहे.



## श्रीलंका व जपान येथील बौद्ध भिक्षूंची नागार्जुन संग्रहालयास भेट

**नागपूर :** बौद्ध इतिहास संस्कृती संशोधन संस्थेद्वारा संचालित संग्राहक स्मृतीशेष दिलीप वानखेडे स्मृती नागार्जुन संग्रहालय, बोधी वाचनालयाच्या शेजारील कुंभारे कामगार वसाहत, न्यू कामठी येथे श्रीलंकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्धिस्ट धम्मा स्कूलचे प्राचार्य भदंत उन्नपान आर्यधम्म महास्थविर, उडवल धम्मिन्दो महास्थविर, यु. सी. सिमदा (जपान), भदंत महानाम आणि श्रमण विपस्सी यांनी भेट दिली. या प्रसंगी त्यांनी तथागत भगवान बुद्धांच्या मूर्तीचे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संबंधित ऐतिहासिक आणि अविस्मरणीय वस्तूंचे अवलोकन केले. लेणी व धम्मलिपी संशोधक अतुल भोसेकर आणि नाट्य दिग्दर्शक अशोक जांभुळकर यांनीही संग्रहालयाला भेट देऊन तेथील कलाकृती ऐतिहासिक तसेच अभ्यासनीय असल्याचे सांगितले. भेटीदरम्यान उपस्थित सर्व मान्यवरांनी अभ्यासक व नागरिकांनी संग्रहालयाला भेट देऊन चिकित्सक चिंतन करावे, असे आवाहन केले. या वेळी भदंत नाग दिपंकर महास्थविर, प्रमोद कुंभारे, शुद्धोधन पाटील, प्रमोद टेंभुर्णे, अविनाश वानखेडे, गौतम माटे, नगरसेवक प्रतीक पडोळे आदी मान्यवर उपस्थित होते.



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर ऊर्जा पार्क घाणीच्या विळख्यात

**नागपूर :** खामला परिसरातील जेतवन कॉलनी, उपाली कॉलनी, अग्नि लेआउट, शास्त्री लेआउट आणि पायोनियर सोसायटी परिसरातील नागरिक व मुलांसाठी उभारण्यात आलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर ऊर्जा पार्क सध्या दुर्लक्षामुळे अतिक्रमण व घाणीच्या विळख्यात सापडले आहे. पार्कमधील गवत वाढल्याने मार्ग ओसंडून गेले आहेत, तसेच नियमित साफसफाई न झाल्याने परिसरात अस्वच्छता पसरली आहे. नागरिकांनी नगरपालिकेकडे तक्रार नोंदवून नियमित साफसफाई व देखभालीची मागणी केली आहे. मात्र, अद्यापही संबंधित विभागाने कोणतीच ठोस कारवाई केलेली नाही. मनपा कर्मचाऱ्यांकडून 'मशीन खराब असल्याने काम थांबले आहे. निधी उपलब्ध झाल्यानंतरच दुरुस्ती होईल,' असे सांगण्यात येत असल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून उद्यानाचे सुशोभीकरण करावे, अशी मागणी निवासी नागरिकांनी केल्याचे ए. के. पाटील, सचिव, बुद्ध विहार समन्वय समिती यांनी सांगितले आहे.

## महत्वाचे

### स्त्री सुरक्षा आणि सबलीकरणासाठी पियुषाची 75 किमी धाव मोहीम




दीक्षाभूमी ते बापूकुटी धावणार नागपूरची कन्या

**नागपूर :** स्त्रियांच्या वाढत्या असुरक्षिततेविरुद्ध आवाज उठवत, दुबईत स्थायिक नागपूरची पियुषा अरुणा सबा यांनी 'मिशन रन फॉर सेफ स्ट्रीट, स्ट्राँग वुमेन' ही मोहीम सुरू केली आहे. या उपक्रमाअंतर्गत त्या 9 नोव्हेंबर रोजी पहाटे 4 वाजता नागपूरच्या दीक्षाभूमीपासून वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम येथील बापूकुटीपर्यंत तब्बल 75 किलोमीटर धाव घेणार आहेत. पियुषा या मूळच्या नागपूरच्या असून सध्या त्या दुबईतील 'लँडमार्क' कंपनीत मॅनेजर पदावर कार्यरत आहेत. त्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या योगा तज्ज्ञ आहेत आणि त्यांनी दुबई इंटरनॅशनल मॅरेथॉन, अबूधाबी इंटरनॅशनल मॅरेथॉन तसेच लेह-लडाख इंटरनॅशनल मॅरेथॉनसह अनेक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.'सेफ स्ट्रीट, स्ट्राँग वुमेन' हा सामाजिक संदेश देत, दीक्षाभूमी ते बापूकुटी दरम्यानची ही धाव पियुषा पहिल्यांदाच पूर्ण करणार आहेत. त्यांच्या या मोहिमेला प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी आपल्या सोयीच्या साधनांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आकांक्षा प्रकाशनतर्फे केले आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन साजरा

**नागपूर :** प्रबुद्ध समाज समिती तारासावंगा शाखा विठ्ठलवाडी नागपूर तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 7 नोव्हेंबर रोजी शाळा प्रवेश दिन इमामवाडा येथे साजरा करण्यात आला. समारंभाचे अध्यक्षस्थानी प्रबुद्ध समाज समितीचे अध्यक्ष पी. आर. धोंगडे होते. त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाविषयी संबोधन केले. एका इंग्रज अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीमुळे डॉ. बाबासाहेबांना शाळेत दाखल करण्यात आले होते. पुढे त्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या शैक्षणिक जीवनावर प्रकाश टाकला. दुसरे प्रमुख वक्ते वासुदेव डोंगरे होते. त्यांनी सुद्धा डॉ. बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशासंबंधी आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की, 'डॉ. बाबासाहेबांच्या अथक परिश्रमामुळे बहुजन समाजाची दुरावस्था नष्ट झाली आहे.' या सभेत इमामवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते विजय चिंचखेडे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना सर्वांनी उदंड व निरोगी आयुष्य लाभो अशा शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला शामकांत जाधव आणि शैलेश मेश्राम यांची विशेष उपस्थिती होती.

# भिक्षूंच्या मैत्री व करूणेमुळे धम्म समाजात पोहोचला : धम्मचारी मैत्रेयसागर



**नागपूर :** भगवान बुद्धांनी अडीच हजार वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या संघामुळे बुद्धांचा धम्म आज आपणापर्यंत पोहोचला, असे प्रतिपादन धम्मचारी मैत्रेयसागर यांनी केले. ते त्रिरत्न बौद्ध महासंघच्या धम्मलोक केंद्रातर्फे आयोजित ऐतिहासिक संघ जयंती समारंभात बोलत होते. मैत्रेयसागर यांनी सांगितले की, संघातील भिक्षूंनी आपल्या मैत्री आणि करूणेच्या भावनेतून विविध त्याग करून धम्म लोकाभिमुख करण्याचे कार्य केले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच आज आपण दुःखमुक्तीच्या दिशेने वाटचाल करत आहोत. आजचा दिवस भगवान बुद्धांनी स्थापन केलेल्या संघाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धम्मचारीणी अमलचंद्रा यांनी केले, संचालन धम्मचारी निर्मलवज्र यांनी केले. मैत्री भावनेचे ध्यान धम्मचारीणी आर्यधारीणी यांनी घेतले, तर सप्तांग पूजेचे नेतृत्व धम्मचारीणी आर्यरुची यांनी केले. समारंभाचा समारोप आभार प्रदर्शन व धम्मपालन गाथेने झाला, ज्याचे नेतृत्व धम्मचारी विनयसागर यांनी केले.

# शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत 'वंदे मातरम्' राष्ट्रगीताचे समूहगान



**अंजनगाव सुर्जी :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग तसेच सांस्कृतिक विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 7 नोव्हेंबर रोजी 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीत रचनेला 150 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल साजरा करण्यात आला. संत देवनाथ महाराज औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्यावतीने विद्यानिकेतन आयटीआयच्या प्रांगणात भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी पोलीस निरीक्षक सूरज बोण्डे, अतिथी प्राचार्य डॉ. मेहेत्रे, गटनिदेशक कळंबे, शिल्पनिदेशक दांडगे, आयटीआयचे प्राचार्य निलेश धोटे उपस्थित होते. सकाळी 9:50 वाजता विद्यार्थी, कर्मचारी आणि निदेशकांनी वंदे मातरमच्या समूहगायनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. मुख्य वक्ते प्रा. प्रफुल्ल कात्रे यांनी वंदे मातरम् राष्ट्रगीताचे महत्त्व स्पष्ट करताना विद्यार्थ्यांना राष्ट्रप्रेम आपल्या कृतीतून व्यक्त करण्याचे आवाहन केले. डॉ. मेहेत्रे यांनीही वंदे मातरम्चे महत्व अधोरेखित केले. संस्थेच्या प्रशिक्षणार्थ्यांनी 'वंदे मातरम्' या थीमवर पथनाट्य, शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणारे सादरीकरण, तसेच देशभक्तीपर गीतांवरील नृत्य सादर केले. सादरीकरणात स्मिता राऊत, बानोरे आणि बेलोकार यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कळंबे, दांडगे, वानरे, वानखडे, हेडाऊ, गवई, फरकुंडे, केदार, अस्वार तसेच राऊत, बानोरे, खांडेकर, बेलोकार, लांजे, संदीप बोदडे, तेजस काठोळे, राम गोहर, माजी सैनिक हटेल, हरणे, भावे, धुवे आणि शिंगणे यांनी मनापासून परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन गौतम वाहूरवाघ यांनी केले.

# दीक्षाभूमी विस्तारीकरणासाठी जनतेचे स्वाक्षरी अभियान

## शासनास त्वरित कार्यवाहीची मागणी



**नागपूर :** दीक्षाभूमीचे सौंदर्यीकरण तसेच CICR ची जमीन संपादित करून दीक्षाभूमीचे विस्तारीकरण व विकास करण्यात यावे, या मागणीसाठी जनतेकडून स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. तसेच अनेक संघटनांच्या लेटरहेडवरून या मागणीचे निवेदन मागविण्यात आले. ही सर्व निवेदने जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर, एनआयटी कमिश्नर सिव्हिल लाईन्स नागपूर आणि नागपूर महानगरपालिका आयुक्त यांना 'दीक्षाभूमी बचाव विस्तारीकरण विकास सौंदर्यीकरण समिती'च्या वतीने देण्यात आली. या निवेदनांच्या प्रती कृषी मंत्री भारत सरकार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र सरकारमधील कृषी मंत्री, पर्यटन मंत्री तसेच समाजकल्याण मंत्री यांनाही ईमेलद्वारे पाठविण्यात आल्या. समितीने दीक्षाभूमीचे CICR च्या जमीनीसह त्वरित विस्तारीकरण करण्याची मागणी केली असून, ही मागणी मंजूर न केल्यास आंबेडकरी जनता तीव्र आंदोलन करेल असा इशारा संबंधित विभागाच्या आयुक्तांना निवेदनाद्वारे देण्यात आला. निवेदन देताना विशाल वानखेडे, राज रक्षित, अविनाश कठाणे, विनायक हाडके, प्रभाकर रंगारी, लिलाधर मेश्राम, रजनी पिल्लेवान, शालिनी वानखेडे, कविता लांडगे, शालिनी दुबे, सुनंदा वाघमारे, सरला मेश्राम, आर्यन कांबळे, शैलेश झटाले, रेशमा वासनिक, रेखा रामटेके आदी उपस्थित होते.

# प्रार्थना महोत्सवात अंधश्रद्धा पसरवण्याचा निषेध




**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने नागपूरच्या पोलिस आयुक्तांना दिलेल्या तक्रारीत, नागपूर येथील कस्तुरचंद पार्कमध्ये झालेल्या प्रार्थना महोत्सवात अंधश्रद्धा विरोधी कायद्याचे उल्लंघन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही तक्रार 7 नोव्हेंबर 2025 रोजी दाखल करण्यात आली. तक्रारीत नमूद करण्यात आले आहे की, तीन दिवस चाललेल्या या प्रार्थना महोत्सवातील एका व्हिडिओमध्ये प्रार्थनेद्वारे सर्व आजार आणि समस्या बऱ्या होऊ शकतात, असा दावा करण्यात आला आहे. समितीने सांगितले आहे की अशा प्रकारचे दावे करणे हे अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यानुसार दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा ठरतो. तसेच समितीने स्पष्ट केले की, 'प्रार्थनेद्वारे आजार बरे होतात' हे सिद्ध करणाऱ्यासाठी 21 लाख रुपयांचे आव्हान मागील 35 वर्षांपासून खुले आहे, मात्र अद्याप कोणीही ते सिद्ध करू शकलेले नाही. कस्तुरचंद पार्क येथे ख्रिश्चन समुदायाच्या प्रार्थना महोत्सवादरम्यान झालेल्या या घटनेविषयी समितीच्या वतीने स्थानिक पोलिस आयुक्त आणि उपआयुक्तांना तक्रार व निवेदन देण्यात आले. पोलिस आयुक्तांनी या प्रकरणात तात्काळ कारवाईचे आश्वासन देऊन आवश्यक आदेशही जारी केले. समितीच्या म्हणण्यानुसार, तीन दिवसांच्या या उत्सवाचा व्हिडिओ एका YouTube चॅनेलवर पाहिला गेला, ज्यात प्रार्थनेद्वारे सर्व आजार, दुःख, अडचणी आणि समस्या दूर होतात, असा दावा करण्यात आला आहे. समितीच्या मते हे विधान संविधानाच्या विरोधातील असून, जनतेची दिशाभूल करणारे आहे. त्यामुळे हा कार्यक्रम तात्काळ थांबवावा, तसेच अशा प्रकारे नागरिकांना फसवणाऱ्यांविरुद्ध अंधश्रद्धा आणि जादूटोणा विरोधी कायदा, 2013 अंतर्गत कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. या शिष्टमंडळात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे, नागपूर जिल्हा सरचिटणीस डॉ. सुनील भगत, कार्यकारी अध्यक्ष चित्तरंजन चौरे, उत्तर नागपूर शाखा अध्यक्ष देवानंद बडगे, वैज्ञानिक जागृती प्रकल्प सचिव देवयानी भगत, दक्षिण नागपूर शाखा अध्यक्ष मंगला गाणार, तसेच निखिल बोरिये, धम्मरक्षित मुरमाडकर दाम्पत्य आणि अन्य मान्यवर सदस्य उपस्थित होते.

# व्यवस्था परिवर्तनासाठी रिपब्लिकन लोकशाही मोर्चा मैदानात : प्रा. रमेश पिसे



**कामठी :** देशात एका विशिष्ट वर्गाचे प्राबल्य वाढत असून धर्म आणि जातीच्या नावावर ओबीसी, एससी, एसटी तसेच अल्पसंख्यांक समाजावर अन्याय होत आहे. नागरिकांचे मूलभूत अधिकार मिळवण्यासाठी रिपब्लिकन लोकशाही मोर्चा निवडणुकीच्या रिंगणात उतरला असल्याचे प्रा. रमेश पिशे यांनी सांगितले. रिपब्लिकन लोकशाही आघाडी पुरस्कृत कामठी नगर विकास कृती समितीच्या निवडणूक कार्यालयाचे उद्घाटन जेष्ठ आंबेडकरी विचारवंत जनार्दन मुन यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला कामगार नेते अरुण गाडे, आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशनचे प्रा. मधुकर उईके, राष्ट्रीय आंबेडकरी प्रबोधनकार अनिरुद्ध शेवाळे, सिटूचे काम्रेड राजेंद्र साठे, संभाजी ब्रिगेडचे प्रताप पटले, कास्ट्राईब शिक्षक संघटनेचे प्रा. एम. एस. वानखेडे, कामगार नेते श्यामराव हाडके आणि रवि पोथारे उपस्थित होते. अरुण गाडे यांनी रिपब्लिकन मोर्चाची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, रिपब्लिकन म्हणजे समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्यायावर आधारित लोकशाही मूल्ये जपणारी विचारधारा आहे. ही विचारधारा रुजविण्यासाठी मोर्चाची स्थापना करण्यात आली असून जनतेने या चळवळीला साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच बुद्धभूमी कामठी आणि वडसा प्रेरणाभूमीचे संयोजक व सामाजिक कार्यकर्ते राजकुमार रामटेके यांना कामठी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी घोषित करून त्यांना बहुमताने निवडून देण्याचे आवाहनही केले. कार्यक्रमात अनिरुद्ध शेवाळे, प्रताप पटले, प्रा. एम. एस. वानखेडे आणि श्यामराव हाडके यांनीही विचार मांडले. कार्यक्रमाचे संचालन आणि भूमिका राजकुमार रामटेके यांनी मांडली. उपस्थितांमध्ये इलियास भाई, गणेश आगाशे, आरजू कांबळे, रविजय नागराले आणि भीमराव वाघमारे यांचा समावेश होता.

# जीवनापूर येथे विद्यार्थी दिन मोठ्या उत्साहात साजरा



**जीवनापूर :** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा, जीवनापूर येथे 7 नोव्हेंबर रोजी 'विद्यार्थी दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका अर्चना खैरे होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून जयमाला भैसारे, विमल शिवरकर, वंदना शिवरकर, भारती दूधपचारे, प्रमिला दूधपचारे आणि पालक प्रतिनिधी सरिता चन्ने उपस्थित होत्या. विद्यार्थी दिनानिमित्त सुविचार लेखन आणि निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. सुविचार स्पर्धेत आरोही विनोद घुबडे (चतुर्थ), रिया नरेश नरुले (चतुर्थ), ओवी दिनेश कडुकार (चतुर्थ) आणि आरोही रुपेश शिवरकर यांनी अनुक्रमे पहिले क्रमांक पटकावले. निबंध स्पर्धेत देवदत्त गिरीधर पाटील प्रथम, देवेश मच्छिंद्र गजभिये द्वितीय आणि आशिमा अच्छिंद्र गजभिये तृतीय क्रमांकाचे विजेते ठरले. परीक्षक म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप दूधपचारे यांनी आवर्जून सहभाग घेतला आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. शिक्षकवर्ग व पालकांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. विद्यार्थी दिनाचे महत्त्व आणि पार्श्वभूमी याविषयी माहिती शिक्षिका माधुरी सेलोकर यांनी दिली, तर अध्यक्षीय भाषणातून मुख्याध्यापिका अर्चना खैरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून सर्वांना विद्यार्थी दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

PROPERTY FOR SALE
Prime Land with
Construction for Sale
Wela (Hari), Shankarpur Road, Nagpur (Gramin)
Perfect for Educational Institutions:
Area 0.46 hectares (50,000 Sq. Ft) with construction around 35000 Sq. Ft., Ideal for Schools, College, Training Center, Residential Tution College, Hotel, Hostel, Ambusman Park




Contact : Sulay 9860361121

बहुजन सौरभ

## इथे संपर्क साधावा

- **प्रवीण गायकवाड**
  09850301528
  विश्वकर्मा नगर, कुकडे लाऊड, वंजारीनगर, एम्प्रेस मिल कॉलनी
- **निलेश कांबळे**
  मो नं. 94236 34976
  **एरिया :** उंटखाना, दत्तात्रयनगर, सुभेदार ले आउट , म्हाळगीनगर
- **सुनील कुंभारे**
  मो नं. 98238 94329
- **विशाखा नारायणे**
  मो नं 99602 41648
  **एरिया :** जोगी नगर , काशी नगर, धाडीवाल ले आऊट, सुयोग नगर, रानवाडी
- **प्रमोद चहांदे**
  मो नं 9273170800
  जोगी नगर, धाडीवाल ले आऊट, संयोग नगर, नरेंद्र नगर,
- **चंदू नगरारे**
  मो नं. 9975968852
  शताब्दी नगर, काशी नगर, अभयनगर, जयवंतनगर, भीम नगर, जोगी नगर.
- **निलेश वालदे**
  मो.नं.9764772886
  मोहन नगर. गौतम नगर, गड्डीगोदाम परिसर
- **मसारकर**
  918080158604
  धाडीवाल ले आउट.
- **लिना विनोद भोवते**
  मो.नं. 9021770694
  इंदोरा, जरीपटका, भीमचौक, नाराघाट.
- **प्रविण राजाराम ठवरे**
  मो.नं. 9372331798
  मॉडेल टॉऊन, बेझनबाग.
- **रितेश अनिल बोदेले**
  मो.नं. 9511843694
  WCL पॉव ग्रीड
- **गगन प्रताप नाहारकर**
  मो.नं. 8793389936
  मेकोसाबाग, नवा नकाशा.
- **प्रमोद बागडे**
  मो.नं. 9764973627
  इंदोरा, सुगत नगर.
- **बी प्रकाश राव**
  मो.नं. 9022621075
  भीमचौक, बेझनबाग, मेकोसाबाग.
- **पुष्पीत कराडे**
  मो.नं. 8055416108
  वैशाली नगर, राणी दुर्गावती चौक.
- **राहुल राजकुमार जांबुळकर**
  मो.नं. 9673392025
  नारी.
- **श्रीकांत वासनिक**
  मो.नं. 9767624345
  काचीपूरा, बाबूळखेडा, पार्वती नगर, रमा नगर, जय भिम नगर.
- **मंगेश शंभरकर**
  मो.नं. 9970258703
  नरेंद्र नगर, सुयोग नगर, भिम नगर, शताब्दी नगर.
- **निळकंठ वि. जवादे**
  मो.नं. 9623773365
  रमा नगर, मनीष नगर.
- **विनोद कृष्णराव डूले**
  वेदांगा न्यूजपेपर, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, . 7447767922
- **आशिष थुल**
  9423400956
  धरमपेठ, आंबेडकरनगर
- **राम मानवटकर**
  8626037360,
  न्यू. मनिष नगर
- **अमन शरणागत**
  9575673895
  टेकअप सिटी , दिघोरी, बहादूरा पेपर एजन्सी,
- **राहुल आठवले**
  8485854398
  संबोधी बुद्ध विहार, गिट्टीखदान, काटोल रोड, नागपूर
- **दिगाबर पांडुरंग वासनिक**
  9561974131
  454- नविन सुभेदार ले आऊट
  दिनेश पेपर एजन्सी

## आजचे कार्यक्रम

**हलबी बोलीभाषा कवी संमेलन**

वेळ : 9 नोव्हेंबर 2025, दु. 2.00
स्थान : यमाजी महाराज देवस्थान, खापरे पुरा, ईतवारी, नागपूर.
विषय : आदिवासी हलबी बोलीभाषा कविता संग्रह प्रकाशन समारंभ व हलबी बोलीभाषा कवी संमेलन

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648